# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

MAHARASHTRA ELECTRICITY REGULATORY COMMISSION

॥ आदित्य हृदयम ॥

## वार्षिक अहवाल २००७-२००८

**जयति जयति सूर्या: सप्त लोकैक दीप:**
**किरणम् इति तथाप: सर्व दु:खस्य हर्ता ।**
**अरुणकिरण गम्याश्चधीर आदित्यमूर्ति:**
**परम परम दिव्य: भास्कराष्टम नमामि ।।**



**डॉ. प्रमोद देव**
अध्यक्ष



**श्री. ए. वेलायुथम**
सदस्य



**श्री. एस. बी. कुळकर्णी**
सदस्य

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| अध्यक्षांचे मनोगत | १ |
| सन २००७-२००८ चा आढावा | २ |
| ग्राहक वीज मागणीचे व्यवस्थापन आणि ऊर्जा संवर्धन | २ |
| नियोजित भार नियमन वाढविण्यासाठी महावितरण कंपनीचा प्रस्ताव | ४ |
| वीज दरासंबंधीच्या याचिका | ४ |
| इतर आदेश | ७ |
| आयोगाचे निर्देश - अनुपालन संनियंत्रण कक्ष | ११ |
| ग्राहक आधार कक्ष | १२ |
| विद्युत लोकपाल (इलेक्ट्रिसिटी ओम्बड्समन) | १२ |
| परिशिष्ट- १ सन २००७-२००८ मध्ये आयोगासमोर दाखल झालेल्या याचिका | १३ |
| परिशिष्ट- २ सन २००७-२००८ मध्ये आयोगाने पारित केलेले आदेश | २० |
| परिशिष्ट- ३ दिनांक ०१-०४-२००७ ते ३१-०३-२००८ कालावधीकरिता अलेखापरिक्षित आय-व्यय पत्रक | २७ |

# अध्यक्षांचे मनोगत

महावितरण कंपनीच्या परवाना क्षेत्रात दरवर्षी विजेच्या मागणीत १०००-१२०० मेगावॉटची वाढ होत आहे. त्याचवेळी, वीज पुरवठा मात्र तुलनेने स्थिर राहिला आहे. सन २००७-०८ मध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या परवाना क्षेत्रात विजेची टंचाई ५००० मेगावॉटहून अधिक वाढली. परिस्थितीने इतके गंभीर वळण घेतले की, आतापर्यंत ज्या मुंबई शहराला वीज तुटवड्याला सामोरे जावे लागले नव्हते त्या शहरालादेखील वीज तुटवडा आणि संभाव्य भार नियमनाची झळ पोहोचण्याची शक्यता निर्माण झाली. परिणामी, विजेची मोठ्या प्रमाणातील तूट कमी करुन आणि वीज व्यवस्थापन करण्यावर आयोगास सलग तिसऱ्या वर्षी देखील लक्ष केंद्रीत करावे लागले.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने, विद्युत अधिनियम, २००३ ने घालून दिलेल्या चौकटीत राहून, विविध आदेश व विनियमांद्वारे, राज्यातील सर्व भागांमध्ये व ग्राहकांच्या सर्व वर्गवारींमध्ये उपलब्ध विजेचे वाटप सम-प्रमाणात व्हावे याची खात्री करण्याकरिता सर्वतोपरी प्रयत्न केले. आयोगाने वेळोवेळी पारित केलेल्या वीज दराच्या आदेशांद्वारे, वीज निर्मिती क्षमतेत भर घालणे, नूतनीकरण आणि आधुनिकीकरण, वाढीव क्षमतेचा सुयोग्य वापर, हानि कमी करणे, फीडर विभक्त करणे, मुक्त-प्रवेश, यासारख्या पारंपरिक उपाय-योजनांना प्रोत्साहन दिले. याशिवाय, स्व-वापरासाठीच्या विद्युत निर्मिती प्रकल्पांमधील विजेचा वापर करण्याकरिता ''सीआयआय-पुणे'', यासारख्या नाविन्यपूर्ण संकल्पनांना आयोगाने चालना दिली. तसेच, विद्युत कंपनीने करावयाचे ग्राहक वीज मागणीचे व्यवस्थापन (डीएसएम) आणि स्थानिक वीज निर्मितीवर आधारित फ्रॅन्चायसी योजना किंवा ''पुणे मॉडेल-२'', यासारखे उपक्रम तयार करण्यात महत्वाची भूमिका आयोगाने बजावली आहे.

अहवाल वर्षात, आयोगाने फ्रॅन्चायसी योजनेची संकल्पना अधिक स्पष्ट केली. याबाबतीत, आयोगाचे असे मत आहे की, जोपर्यंत स्पर्धात्मक बोली प्रक्रियेच्या मार्गाने फ्रॅन्चायसीची निवड करुन त्याची नियुक्ति होत नाही तोपर्यंत, अधिक किंमत देऊन जादा वीज खरेदी करणे सुलभ व्हावे यासाठी, परवानाधारक फ्रॅन्चायसीची तात्पुरती नेमणूक करु शकेल. यामुळे, निवडक भागातील भार नियमन शिथील करणे शक्य होईल. मात्र त्यासाठी, ज्या भागातील ग्राहक भार नियमनातून मुक्त होणार आहेत त्या भागातील ग्राहकांना अतिरिक्त वीज खरेदीवरील खर्च वसूल करण्यासाठी 'अतिरिक्त रिलायेबिलीटी आकार' भरावा लागेल.

आयोगाने, ग्राहकांच्या वीज मागणी व्यवस्थापनाच्या अंदाजपत्रकांना मंजूरी दिली. तसेच, यासाठी लागणारा निधी वीज दराच्या माध्यमातून उभारण्यास परवानगी दिली. यामुळे, ग्राहकांच्या वीज मागणीचे व्यवस्थापन अंमलात आणण्यासाठी वितरण परवानाधारकाकडे निधी उपलब्ध होण्याचा एक स्रोत आपोआप तयार झाला. त्याचप्रमाणे, आयोग आणि वीज परवानेधारक यांना वीज मागणी व्यवस्थापनासंबंधीची अधिक माहिती मिळावी याकरिता अमेरिकेतील कॅलिफोर्निया एनर्जी कमिशन (सीईसी), कॅलिफोर्निया पब्लिक युटिलिटीज कमिशन (सीपीयुसी) आणि लॉरेन्स बर्कली नॅशनल लॅबोरेटरी (एलबीएनएल) यांच्याबरोबर, आयोगाने सामंजस्य करार केले.

आयोगाने सन २००८ मध्ये, बहु-वर्षीय वीज दराचे आदेश पारित करताना, वितरण हानि, स्टेशन हिट रेट, सहाय्यकारी ऊर्जा वापर इ. साठी कार्यक्षमतेचे मापदंड घालून देणारी मार्गदर्शिका विनिर्दिष्ट केली. बहु-वर्षीय वीज दराच्या आदेशात ठरवून दिलेल्या मार्गदर्शिकेपेक्षा अधिक चांगली कामगिरी करणाऱ्या विद्युत कंपन्यांना प्रोत्साहन मिळावे याकरिता, नियंत्रणाधीन घटकांमुळे झालेले लाभ आणि तोटे विद्युत कंपनी व विद्युत ग्राहक यांच्यामध्ये वाटून घेण्याची संकल्पना आयोगाने मांडली. आयोगाने, सन २००७-०८ मध्ये विद्युत कंपन्यांच्या वार्षिक कामगिरीचा आढावा घेणे, प्रथमच सुरु केले. अशा आढाव्याखाली ही संकल्पना अंमलात आणली. यामुळे चांगली कामगिरी करणाऱ्या विद्युत कंपन्यांचा फायदा झाला. तसेच, चांगल्या कामगिरीमुळे महसूलात भर घालणे त्यांना शक्य झाले आहे. महावितरण कंपनीनेदेखील वितरण हानि मोठ्या प्रमाणावर कमी केली असून अतिरिक्त महसूल प्राप्त झाल्याने त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली आहे.

अधिनियम, विनियम व आदेशांतील तरतुदींचे पालन विद्युत कंपन्यांद्वारे होते किंवा नाही याचे संनियत्रण करणे, हा आयोगाच्या कार्याचा एक महत्वाचा भाग आहे. भार नियमनाच्या कार्यपध्दतीची अंमलबजावणी, वीज पुरवठ्याच्या विश्वासार्हतेचे निर्देशांक, विद्युत वाहिन्या आणि वितरण रोहित्रांवर मीटर बसविणे याबाबतची सद्यस्थिती, विद्युत उप-केंद्रांकडून पुरविलेल्या विजेचा दर्जा, इ. बाबतची माहिती गोळा करणे शक्य व्हावे याकरिता आयोगाने सन २००७-०८ मध्ये जागेवर जाऊन तपासण्या करण्याचे काम सुरु केले.

अहवाल वर्षात, पारेषणाचे नियोजन करण्यावरही आयोगास लक्ष केंद्रीत करावे लागले. ऊर्जेचे अंतरिम संतुलन व हिशोब पूर्ण करण्याच्या पध्दतीत सुधारणा, महाराष्ट्र राज्य विद्युत समितीची स्थापना, पारेषण यंत्रणेच्या कामकाज व नियोजन याबाबतच्या समस्या, या प्रकारची कामे, आयोगाच्या मार्गदर्शनाखाली विविध शक्ति प्रदान संस्थांनी हाताळली.

वीज पुरवठ्यातील तूट काही वर्षे तरी राहण्याची शक्यता आहे; त्यामुळे फ्रॅन्चायसी योजनेसारख्या नाविन्यपूर्ण संकल्पनांद्वारे महाराष्ट्र राज्यात भार नियमन शिथील करणे, महावितरण कंपनीने वितरण हानि कमी करण्याच्या कामात केलेली सुधारणा पुढे चालू ठेवणे, या बाबींवर आयोगास यापुढेही लक्ष केंद्रीत करावे लागणार आहे.

प्रमोद देव

**डॉ. प्रमोद देव**

# सन २००७-२००८ चा आढावा

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कामकाजाचे हे आठवे वर्ष आणखी एकदा खूपच आव्हानात्मक ठरले. याचे प्रमुख कारण म्हणजे राज्यात विजेची तीव्र टंचाई पुढे चालू राहिली.

आयोगाने अहवाल वर्षात अनेक प्रगतिकारक उपाय योजना केल्या. त्यामध्ये खालील बाबींचा समावेश होता-

- आयोगाने दिनांक १७ मे, २००७ च्या आदेशाद्वारे राज्यांतर्गत ऊर्जेचे संतुलन व त्यानुसार हिशोब पूर्ण करण्याची पध्दत महाराष्ट्र राज्यात सुरु केली आणि विविध वितरण परवानाधरकांना त्यांच्या भूमिका व जबाबदाऱ्या सोपविल्या.
- आयोगाने, मेसर्स ग्लोबल एनर्जी लि. या कंपनीला वार्षिक १०० दशलक्ष युनिट्सपर्यंत राज्यांतर्गत विजेचा व्यापार करण्यासाठी परवाना दिला. राज्यांतर्गत व्यापाराकरिता आयोगाने दिलेला हा पहिलाच परवाना आहे.
- विद्युत ग्राहकांच्या तकारींना प्रतिसाद देण्यासाठी आयोगामध्ये ग्राहक आधार कक्ष फेब्रुवारी, २००८ मध्ये स्थापन करण्यात आला.
- कॅलिफोर्निया एनर्जी कमिशन (सीईसी), कॅलिफोर्निया पब्लिक युटिलिटीज कमिशन (सीपीयुसी), आणि लॉरेन्स बर्कली नॅशनल लॅबोरेटरी (एलबीएनल) यांच्याशी आयोगाने डिसेंबर, २००७ मध्ये सामंजस्य करार केला आहे. सदर करार ४ वर्षे अंमलात राहील.

या सामंजस्य करारामध्ये खालील क्षेत्रात माहितीची देवाण-घेवाण आणि संयुक्त संशोधन अभिप्रेत आहे:-

- ऊर्जेचा कार्यक्षमतेने वापर आणि वीज मागणी व्यवस्थापनाबाबतची धोरणे
- नूतनशील ऊर्जेच्या विकासाकरिता नियामक धोरणे
- स्रोतांचे एकत्रित नियोजन
- विजेचे विनियमन आणि नियंत्रण
- पारेषण दराची रचना
- महाराष्ट्रातील विजेच्या व्यापारातील संतुलनाची चौकट
- मुक्त प्रवेश आणि ग्राहकांच्या पसंतीद्वारे वीज व्यापाराचा विकास

### आयोगाच्या बैठका

आयोगाचे अध्यक्ष, डॉ. प्रमोद देव यांच्या अध्यक्षतेखाली, सदस्य श्री. ए. वेलायुथम व श्री. एस. बी. कुलकर्णी, यांच्यासमवेत आयोगाच्या अहवाल वर्षात ११ बैठका झाल्या.

### राज्य सल्लागार समिती

आढाव्याखालील वर्षात राज्य सल्लागार समितीच्या दोन बैठका झाल्या. दिनांक २ जुलै, २००७ रोजी झालेल्या आठव्या बैठकीत ऊर्जा संवर्धनाकरिता अधिक प्रभावी व सर्वंकष उपाय-योजना करण्यावर भर देण्यात आला. बैठक घेण्यामागील उद्देश समितीच्या सदस्यांना विशद करून त्यांना, विजेच्या मागणी व पुरवठ्याच्या चिंताजनक परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी करावयाच्या उपाय-योजनांबाबत मौलिक सूचना/अभिप्राय देण्याचे आवाहन अध्यक्षांनी केले.

समितीच्या ३० नोव्हेंबर, २००७ रोजी झालेल्या नवव्या बैठकीत, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने (महापारेषण कंपनी) आगामी पाच वर्षात करावयाची गुंतवणूक, याबाबत प्रामुख्याने चर्चा करण्यात आली. पाच वर्षाचा गुंतवणूक कार्यक्रम समितीपुढे ठेवण्याचा मुख्य उद्देश, समितीच्या सदस्यांनी त्यावर व्यक्त केलेली मते लक्षात घेऊन त्यानुसार आवश्यक सुधारणा करुन आयोगापुढे मंजूरीसाठी सादर करणे शक्य व्हावे, हा होता. महापारेषण कंपनीने खालील मुद्यांवर सादरीकरण केले-

- संपूर्ण महाराष्ट्र राज्याकरिता ५ वर्षाचा पारेषण आराखडा.
- महापारेषण कंपनीचा ५ वर्षांकरिता गुंतवणूक कार्यक्रम.
- पारेषणामध्ये खाजगी क्षेत्राच्या सहभागाबाबत महापारेषण कंपनीचा प्रस्ताव.

आयोगाने महापारेषण कंपनीला खालील सूचना केल्या-

(१) नवीन पारेषण जाळे विकसित केल्यामुळे विद्युत निर्मिती केंद्रांतून केवळ विजेचे वहन करु नये तर मुक्त प्रवेश ग्राहक आणि इतर अनेक विद्युत कंपन्यांच्या गरजा देखील पूर्ण कराव्यात.

(२) व्होल्टेज वाढण्याची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी महापारेषण कंपनीने पुरेसे नियोजन करण्याची गरज आहे. यावर महापारेषण कंपनीने स्पष्ट केले की, अशा परिस्थितीची प्रस्तावित योजनेत पुरेशी काळजी घेण्यात आली आहे.

महापारेषण कंपनीच्या सादरीकरणाच्या वेळी अन्य सदस्यदेखील चर्चेत सहभागी झाले.

# ग्राहक वीज मागणीचे व्यवस्थापन आणि ऊर्जा संवर्धन

ग्राहक वीज मागणीचे व्यवस्थापन, ऊर्जा संवर्धन व त्या आनुषंगाने विद्युत भार वाढण्याचे संशोधन, ग्राहक सर्वेक्षण हे कार्यक्रम, राज्यातील विद्युत वितरण परवानाधारकांच्या कामकाजाचा एक अविभाज्य भाग म्हणून त्यांच्या कामकाजात समाविष्ट करण्याच्या आयोगाच्या प्रयत्नांना यश मिळत असल्याचे सन २००७-०८ मध्ये दिसून आले. १) सन २००८-०९ करिता वीज मागणीचे व्यवस्थापन, ऊर्जा संवर्धन याकरिता स्वतंत्र अंदाजपत्रकास मंजूरी दिली आणि त्यांचा सन २००८-०९ च्या वार्षिक महसूली गरजेमध्ये समावेश करण्यास परवानगी दिली; २) वीज मागणी व्यवस्थापनाच्या पथदर्शक प्रकल्पांना मंजूरी दिली; ३) अमेरिकेतील कॅलिफोर्निया एनर्जी कमिशन (सीईसी), कॅलिफोर्निया पब्लिक युटिलिटीज कमिशन (सीपीयुसी) आणि लॉरेन्स बर्कली नॅशनल लेबॉरेटरी (एलबीएनएल) यांनी वीज मागणी व्यवस्थापनासंबंधी अद्यावत माहितीद्वारे आयोगाच्या व वितरण परवानाधारकांच्यासुध्दा ज्ञानाची व्याप्ती वाढविण्यासाठी त्यांच्याशी सामंजस्य करार (एमओयु) केला; आणि ४) राज्यातील वितरण परवानाधारकांकरिता वीज मागणी व्यवस्थापन व संबंधित क्षेत्रात प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले; अशाप्रकारे वीज मागणी व्यवस्थापनाच्या क्षेत्रातील महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये आयोगाने अहवाल वर्षात थेट पुढाकार घेतला.

## अहवाल वर्षातील नवीन पथदर्शक प्रकल्प

वीज मागणी व्यवस्थापन आणि ऊर्जेचा कार्यक्षम वापर यासंबंधीच्या पथदर्शक प्रकल्पांना पाठिंबा देण्याचे धोरण आयोगाने या वर्षीही पुढे चालू ठेवले. रिलायन्स एनर्जी लिमिटेडच्या (आरईएल) वीज मागणी व्यवस्थापनाचा एक पथदर्शक प्रकल्प आणि टाटा पॉवर कंपनीच्या (टीपीसी) वीज मागणी व्यवस्थापनाचा एक प्रस्ताव मिळून एकूण रु. ४.६११ कोटीच्या खर्चास आयोगाने अहवाल वर्षात मंजूरी दिली.

आरईएलच्या पथदर्शक प्रकल्पांतर्गत रस्त्यावरील सध्याच्या ऊर्जा कार्यक्षम मर्क्युरी व्हेपरवरील दिव्यांऐवजी उच्च दाबाचे सोडीयम व्हेपरचे दिवे बसविण्यात येणार आहेत. या प्रकल्पामुळे दर वर्षी अंदाजित ४.५६ दशलक्ष युनिट विजेची बचत होणार आहे. तसेच विद्युत भार देखील १.१ मेगावॉटने कमी होणार आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याचे काम सध्या चालू असून प्रकल्पावरील एकूण रु. ४.४६ कोटींचा खर्च हा रिलायन्स एनर्जी लि.कडे असलेल्या भार व्यवस्थापन आकाराच्या (एलएमसी) निधीतून भागविण्यात येईल. टीपीसीच्या ऊर्जा कार्यक्षम दिव्यांच्या पथदर्शक प्रकल्पात, सध्याच्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक बॅलास्ट्स असलेल्या टी-८ ट्युब लाईट्सच्या ऐवजी इलेक्ट्रॉनिक बॅलास्ट्स असलेल्या टी-५ ट्युब लाईट्स बसविण्याचा आणि शाळांमध्ये ऊर्जेचा कार्यक्षमतेने वापर/संवर्धनाची मोहीम, यांचा समावेश आहे. या योजनेसाठी होणारा एकूण खर्च रु. ०.१५१ कोटी हा टीपीसीकडील भार व्यवस्थापन आकाराच्या (एलएमसी) निधीतून भागविण्यात येईल. शाळांमध्ये ऊर्जा कार्यक्षमता/संवर्धनाची मोहीम, टीपीसीने एका स्वयंसेवी (रीफ वॉच मरिन कॉन्झर्वेशन) संस्थेच्या सहकार्याने राबविली आहे. या मोहिमेत, मुंबईतील १२ शाळांमध्ये ऊर्जा संवर्धन विषयक जागृती निर्माण करण्याच्या कार्यक्रमांतर्गत ५५ सभा घेण्यात आल्या व त्यात ६००० विद्यार्थी सामील होते; टीपीसीच्या विद्युत निर्मिती केंद्रांना शाळांतील ८०० विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या; ऊर्जा संवर्धनावर प्रश्न-मंजुषेचे कार्यक्रम आयोजित करण्यात येऊन त्यात १०० विद्यार्थी ऊर्जा विजेते म्हणून घोषित करण्यात आले आणि ८० शाळात ऊर्जा संवर्धनाच्या विषयावर भीत्तिपत्रक किंवा भीत्तिचित्र स्पर्धा आयोजित करण्यावर भर देण्यात आला. दिवे बसविण्याच्या प्रकल्पाची अंमबलबजावणी चालू आहे. या प्रकल्पाखाली १८२४ टी-८ ट्युब लाइट्स, टी-५ ट्युब लाइट्सनी बदलण्याचे निश्चित करण्यात आले आहे. याकरिता साधन-सामग्रीचा पुरवठा, दिवे बसविण्याचे तसेच एम अ‍ॅन्ड व्ही योजनेप्रमाणे मोजमापे घेण्याची कामे मेसर्स क्रॉम्प्टन ग्रीव्हज लिमिटेडतर्फे करण्यात येत आहेत.

त्याशिवाय, एलईडीवर आधारित वाहतुक सिग्नल्स बसविल्यास, विजेचा वापर व मागणी किती कमी होईल हे अजमावून पाहण्यासाठी, अभ्यास करण्यास आयोगाने रिलायन्स एनर्जी लि.ला सांगितले होते. त्यानुसार, रिलायन्स एनर्जी लि.ने चेंबूर येथील डायमंड गार्डन आणि वांद्रे येथील एस. व्ही. रोडवरील लकी स्टार हॉटेल, या दोन ठिकाणांच्या जंक्शन्सची निवड करुन अभ्यास केला. या अभ्यासात असे दिसून आले की, डायमंड गार्डन या जंक्शनच्या ठिकाणी, विजेचा दैनिक सरासरी वापर प्रति दिवशी ३८-३९ युनिट्सवरुन ४ युनिट्स इतका खाली आला (९० टक्के बचत) आणि सरासरी मागणी २.३३ किलोवॅट्सवरुन ०.४ किलोवॅट इतकी खाली आली. त्याचप्रमाणे, लकी स्टार हॉटेल, बांद्रा, या जंक्शनच्या ठिकाणी, विजेचा दैनिक सरासरी वापर प्रति दिवशी ५२ युनिट्सवरुन १६.९ युनिट्स इतका खाली आला (६८ टक्के बचत) आणि सरासरी मागणी ३.१२ किलोवॅटसवरुन ०.८ किलोवॅट इतकी खाली आली. हे उत्साहवर्धक परिणाम पाहून, सध्याच्या एलईडीवर आधारित नसलेल्या सिग्नल्सचे एलईडीवर आधारित सिग्नल्समध्ये रुपांतर करण्याकरिता एक योग्य कार्यक्रम/योजना तयार करण्यास रिलायन्स एनर्जी लि.ला कळविण्यात आले आहे.

## ग्राहक वीज मागणी व्यवस्थापनासाठी सन २००८-०९ करिता अंदाजपत्रक

ग्राहक वीज मागणी व्यवस्थापन आणि ऊर्जा संवर्धनाला प्रत्यक्ष चालना मिळावी या उद्देशाने आयोगाने वितरण परवानाधारकांना ग्राहक वीज मागणी व्यवस्थापनासाठी अंदाजपत्रक तयार करुन आयोगाकडे मंजूरीकरिता सादर करण्यास कळविले. त्यानुसार, रिलायन्स एनर्जी लि., टीपीसी व बेस्टने त्यांची अंदाजपत्रके सादर केली आणि त्यांची छाननी झाल्यावर आयोगाने सन २००८-०९च्या अंदाजपत्रकांना मान्यता दिली.

आयोगाने रिलायन्स एनर्जी लि.ला वीज मागणी व्यवस्थापनासाठी सन २००८-०९ करिता निव्वळ रु. २३.४५ कोटीचे अंदाजपत्रक मंजूर केले. त्यापैकी, रु. ९.८४ कोटी रिलायन्स एनर्जी लि.कडे असलेल्या एलएमसीच्या निधीतून खर्च करण्यास तर उर्वरित रक्कम रु. १३.६१ कोटी सन २००८-०९ च्या वार्षिक महसूली गरजेमध्ये समाविष्ट करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

आयोगाने, टीपीसीच्या वीज मागणी व्यवस्थापनासाठी निव्वळ रु. ७.५३ कोटीचे अंदाजपत्रक सन २००८-०९ करिता मंजूर केले. त्यापैकी, रु.३.७२ कोटी टीपीसीकडे असलेल्या एलएमसीच्या निधीतून खर्च करण्यात येतील तर उर्वरित रक्कम रु. ३.८१ कोटी सन २००८-०९ च्या वार्षिक महसूली गरजेमध्ये समाविष्ट करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

बेस्टने, वीज मागणी व्यवस्थापन कार्यक्रम त्यांच्या वार्षिक कामगिरीच्या आढाव्याच्या याचिकेत समाविष्ट केला होता. त्याकरिता, रु.३.७३ कोटीची तरतूद सन २००८-०९च्या अंदाजपत्रकात केली होती.

वितरण परवानाधारकांच्या सन २००८-०९ च्या अंदाजपत्रकांमध्ये वीज मागणी व्यवस्थापनाच्या तरतूदीस आयोगाने मान्यता दिली आहे. त्यामध्ये सर्वसाधारणपणे, स्वतंत्र वीज मागणी व्यवस्थापन कक्षाचा आस्थापना/प्रशासकीय खर्च, वीज मागणी व्यवस्थापन कक्ष आणि परवानाधारकाच्या अन्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण व विकास, संशोधन व इतर अभ्यास, यांचा समावेश आहे. तसेच वीज मागणी व्यवस्थापनाचे आराखडे तयार करणे, विद्युत भार संशोधनास प्रारंभ करणे, साधन-सामग्री, मीटर्स, डेटा लॉगर्स, वीज मागणी व्यवस्थापन कार्यक्रमाची रचना व अंमलबजावणी, या बाबींचाही त्यात समावेश आहे.

## कॅलिफोर्निया पब्लिक युटिलिटीज कमिशन (सीपीयुसी), कॅलिफोर्निया एनर्जी कमिशन (सीईसी) आणि लॉरेन्स बर्कली नॅशनल लॅबोरेटरी (एलबीएनएल) यांच्याशी सामंजस्य करार

अमेरिकेतील कॅलिफोर्निया राज्याने तेथील जनतेचा दरडोई वीज वापर सन १९७५ पासून तीस वर्षाहून अधिक काळ जवळ-जवळ एकाच पातळीवर ठेवला आहे, ही त्या राज्याची एक लक्षणीय कामगिरी आहे. विद्युत मागणीच्या वाढीतील ५० टक्के वाढ विद्युत कंपनीने ऊर्जेचा कार्यक्षमतेने वापर करणारी साधने वापरुन आणि उर्वरित ५० टक्के वाढ ही प्रमाण कार्यक्षमता असलेली विद्युत साधने वापरुन, कमी केली.

कॅलिफोर्नियातील सीईसी आणि सीपीयुसी यांची ही लक्षणीय कामगिरी पाहिल्यानंतर महाराष्ट्रातही ऊर्जा कार्यक्षमता वाढविणे आणि वीज मागणीचे व्यवस्थापन करणे शक्य व्हावे यासाठी आयोग, त्यांच्याशी आणि एलबीएनएल बरोबर चर्चा करीत आहे. याबाबत, महाराष्ट्रातील विद्युत कंपन्या आणि सीईसी, सीपीयुसी आणि एलबीएनएल आणि कॅलिफोर्नियातील विद्युत कंपन्या यांच्या सहकार्याने प्रत्यक्ष काम सुरु करता यावे म्हणून, आयोग आणि सीईसी, सीपीयुसी व एलबीएनएल यांच्यात एक सामंजस्य करार डिसेंबर, २००७ मध्ये करण्यात आला आहे. या कराराचा कालावधी ४ वर्षांचा राहील.

**सामंजस्य कराराखाली सहकार्याची व्याप्ती**

या सामंजस्य करारामध्ये खालील क्षेत्रात माहितीचे अदान-प्रदान आणि संयुक्त संशोधन अभिप्रेत आहे-

- ऊर्जेचा कार्यक्षमतेने वापर आणि वीज मागणी व्यवस्थापनाबाबतची धोरणे
- नूतनशील ऊर्जेच्या विकासाकरिता नियामक धोरणे
- स्रोतांचे एकत्रित नियोजन
- विजेचे विनियमन आणि नियंत्रण
- पारेषण दराची रचना
- महाराष्ट्रातील विजेच्या व्यापारातील संतुलनाची चौकट
- मुक्त प्रवेश आणि ग्राहकांच्या पसंतीद्वारे वीज व्यापाराचा विकास

**सामंजस्य करारानुसार पूर्ण झालेल्या घटना**

- मुंबई येथे दिनांक ११ व १२ डिसेंबर, २००७ रोजी एक कार्यशाळा
- मुंबई येथे दिनांक २२ जानेवारी, २००८ रोजी ''वीज मागणीला प्रतिसाद'' या विषयावरील चर्चा-सत्र
- मुंबई येथे दिनांक १४ ते १८ मार्च, २००८ या कालावधीत वीज मागणी व्यवस्थापन, विद्युत भार संशोधन व स्रोतांचे एकत्रित नियोजन यासंबंधी माहितीदर्शक प्रशिक्षण कार्यक्रम

सामंजस्य करारानुसार, माहितीचे अदान-प्रदान आणि ज्ञानाचा प्रसार करण्यात पुढाकार घ्यावयाचा आहे. त्या आनुषंगाने, विद्युत भार संशोधन मॅन्युअल्स, वीज मागणी व्यवस्थापन, स्रोतांचे एकत्रित नियोजन, विद्युत मागणीबाबत संशोधन, यासंबंधी मागील प्रकरणांचा अभ्यास करावयाचा आहे. तसेच विविध सामग्री व समुध्द पार्श्वभूमी असलेले साहित्य यासह वीज मागणी व्यवस्थापन कार्यक्रमाची रचना व अंमलबजावणी; स्रोतांचे एकत्रित नियोजन, वीज मागणी व्यवस्थापन राबविणे आणि वीज मागणी किती कमी झाली याचा अभ्यास करावयाचा आहे. त्याचप्रमाणे ऊर्जा बचतीचे मूल्यांकन, मापन आणि पडताळणी, वीज मागणी व्यवस्थापनाच्या कार्यक्रमाची आर्थिक परिणामकारकता अजमावून घ्यावयाची आहे. त्याबाबतच्या आवश्यक मार्गदर्शक सूचना, राज्य वितरण परवानाधारकांच्या कर्मचाऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

## नियोजित भार नियमन वाढविण्यासाठी महावितरण कंपनीचा प्रस्ताव

महावितरण कंपनीच्या परवाना क्षेत्रातील विजेच्या मागणी आणि पुरवठ्यामध्ये अंदाजे ५५०० मेगावॅट ते ५७०० मेगावॅट इतकी तफावत झाली होती. त्यामुळे भार नियमनाच्या कार्यपध्दतीत फेर-बदल करण्यासाठी, महावितरण कंपनीने दिनांक ९ फेब्रुवारी, २००७ रोजी याचिका सादर केली. सदर याचिकेमध्ये वेगवेगळ्या विभागांसाठी वेगवेगळे भार-नियमनाचे तास, याबाबतचे पर्याय दर्शविण्यात आले होते. आयोगाने या याचिकेवर हरकती व सूचना मागवून याचिका क्र. २००६/८१वर महावितरण कंपनीने सादर केलेल्या बहु-वर्षीय वीज दराची याचिकेसोबत जाहीर सुनावणी घेतली. विजेच्या मागणी आणि पुरवठ्यातील तफावत ६५०० ते ७००० मेगावॅट झाली. त्यामुळे वेगवेगळ्या विभागांना लागू असलेल्या भार-नियमनात वाढ करण्याकरिता, महावितरण कंपनीने दिनांक १२ एप्रिल, २००७ रोजी दुसरी याचिका क्र.२००७/५ सादर केली. आयोगाने प्रकरण क्र. २००७/५ संदर्भात दिनांक १६ एप्रिल, २००७ रोजी सुनावणी घेतली. आयोगाने दिनांक २३ एप्रिल, २००७ रोजी पारित केलेल्या आदेशात नमूद केले की, आयोगाने यापूर्वी भार नियमनाची कार्यपध्दती घालून दिली होती. त्यामधील उद्देशांकडे महावितरण कंपनीने दुर्लक्ष केले आहे. औद्योगिक आणि नागरी वस्त्या, शेती प्रभावित क्षेत्र आणि इतर पुरवठा विभागांत १:१.४:२.८ हे प्रमाण भार नियमन करण्यासाठी आयोगाने मान्य केले आहे. हे भार नियमनाचे तत्त्व लागू करावयाचे आहे असा दावा करुन, महावितरण कंपनी भार नियमनाचे तास वाढवू शकत नाही. आयोगाने भार नियमनाचे तास वाढवून देण्यासाठी महावितरण कंपनीने केलेली याचिका नामंजूर केली. महावितरण कंपनीने प्रस्तावित केलेली भार नियमनातील आणखी वाढ ही सर्व वर्गवारी व विभागांकरिता समन्यायी नसल्याने आधीच्या दिनांक २० फेब्रुवारी, २००७ मधील आदेशातील भार नियमनाची कार्यपध्दती मंजूर केली.

## वीज दरासंबधीच्या याचिका

### महानिर्मिती कंपनीची बहु-वर्षीय वीज दर चौकटी अंतर्गत आर्थिक वर्ष २००७-०८ ते २००९-१० या नियंत्रण कालावधीकरिता वार्षिक महसूली गरज आणि आर्थिक वर्ष २००७-०८ करिता वीज दर निश्चित करण्यासाठी याचिका

आयोगाने दिनांक २५ एप्रिल, २००७ च्या आदेशाने महानिर्मिती कंपनीची आर्थिक वर्ष २००७-०८ ते २००९-१० या नियंत्रण कालावधीकरिता वार्षिक महसूली गरज निश्चित केली. तसेच आर्थिक वर्ष २००७-०८ च्या २५ एप्रिल २००७ ते ३१ मार्च, २००८ या कालावधीकरिता वीज दर निश्चित केले. या आदेशाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे होती-

- आयोगाच्या वीज दरासंबंधीच्या विनियमांनुसार महानिर्मिती कंपनीकरिता कृती मार्गदर्शिका ठरविण्यात आली होती. याकरिता आयोगाने महानिर्मिती कंपनीच्या प्रत्येक विद्युत केंद्राच्या संचाची

यापूर्वीची कामगिरी व संचाचे आयुर्मान यावर आधारित महावितरण कंपनीच्या औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रांकरिता स्टेशन हिट रेट, सहाय्यकारी वीज वापर इ. युनिट-निहाय कामगिरीची मापदंडे, विचारात घेतली.

- आयोगाने असे मत व्यक्त केले की, पहिल्या नियंत्रण कालावधीमध्ये सुरु होणाऱ्या नवीन युनिट्स/प्रकल्पांकरिता कामगिरीची मापदंडे, भांडवली खर्च आणि वीज दर, यांना आयोग स्वतंत्रपणे मंजूरी देईल.
- महानिर्मिती कंपनीची विद्युत निर्मिती कमी झाल्यामुळे भार नियमनात वाढ होते. त्यामुळे, आयोगाने महानिर्मिती कंपनीला असे निर्देश दिले की, विद्युत दोषामुळे विद्युत पुरवठा बंद होण्याचे प्रमाण कमी करण्याकरिता आणि परिणामी केंद्रांच्या विजेच्या एकूण उपलब्धतेमध्ये सुधारणा करण्याकरिता आवश्यक कार्यवाही त्यांनी करावी.
- आयोगाने महानिर्मिती कंपनी व महावितरण कंपनी यांना असे निर्देश दिले की, त्यांनी एकमेकांशी वाणिज्यिकदृष्ट्या व कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक ठरतील असे करार करावेत.

### महावितरण कंपनीची बहु-वर्षीय वीज दर चौकटी अंतर्गत आर्थिक वर्ष २००७-०८ ते २००९-१० या नियंत्रण कालावधीकरिता वार्षिक महसूली गरज आणि आर्थिक वर्ष २००७-०८ करिता वीज दर निश्चित करण्यासाठी याचिका

आयोगाने, दिनांक २७ एप्रिल, २००७ च्या संक्षिप्त आदेशाने आणि दिनांक १८ मे, २००७ च्या सविस्तर आदेशाने महावितरण कंपनीची आर्थिक वर्ष २००७-०८ ते २००९-१० या बहु-वर्षीय वीज दराच्या नियंत्रण कालावधीकरिता वार्षिक महसूली गरज निश्चित केली. तसेच आर्थिक वर्ष २००७-०८ च्या १ मे, २००७ ते ३१ मार्च, २००८ या कालावधीकरिता वीज दर निश्चित केले. या आदेशाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे-

- विजेची अनिर्बंध मागणी आणि विजेच्या उपलब्धतेच्या अंदाजांबाबत फारच अनिश्चितता होती; त्याचवेळी विजेची मागणी व पुरवठा यामधील तफावत लक्षात घेऊन, आयोगाने फक्त नियंत्रण कालावधीच्या पहिल्या वर्षाकरिता विजेची विक्री व वीज खरेदीची गरज याबाबतचे अंदाज केले.
- विनिर्दिष्ट केलेल्या वर्गवारीतील ग्राहकांना रु. ५०० कोटीचे नियामक दायित्व आकार आर्थिक वर्ष २००७-०८ मध्ये परत करण्याचे निर्देश आयोगाने महावितरण कंपनीला दिले.
- आयोगाने महावितरण कंपनीला त्यांच्या वीज वितरण परवान्याच्या क्षेत्रात वीज मागणीच्या व्यवस्थापनासंबंधीचे उपाय योजण्याचे निर्देश दिले. महागड्या विजेवरील खर्चाचे वाटप फक्त ईएचव्ही पातळीवर किंवा एक्स्प्रेस फीडरवर जोडलेले उद्योग, रेल्वे आणि एक दिवसाच्या सक्तीच्या सुट्टीला तोंड द्यावे लागणारे उद्योग यांच्यामध्ये करुन, आयोगाने अतिरिक्त पुरवठा आकार लावण्याची पध्दत सोपी केली. ज्या वीज वापरावर अतिरिक्त पुरवठा आकार लावावयाचा आहे अशा वीज वापराचे प्रमाण देखील आयोगाने कमी केले.
- वितरण रोहित्रावर व फीडरवर आवश्यक ती मीटर्स बसविण्याची कामे निर्धारित वेळेनुसार पार पाडली जातील, याची खात्री करण्याचे निर्देश आयोगाने महावितरण कंपनीला दिले. त्याचप्रमाणे विद्युत ग्राहकांच्या माहितीसह फीडर-निहाय ऊर्जेसंबंधातील माहिती संकलित करावी आणि ती माहिती ऑक्टोबर, २००७ च्या अखेरीस सादर करावी, असे निर्देशही आयोगाने दिले.
- वाणिज्यिक व तांत्रिक हानि कमी करुन, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षी वितरण हानि ४ टक्क्यांनी कमी करण्याचे निर्देश आयोगाने महावितरण कंपनीला दिले. तसेच असे मत व्यक्त केले की, विजेची टंचाई असताना, तांत्रिक हानि कमी केल्यास विजेच्या विक्रीत वाढ होऊन महावितरण कंपनीचे उत्पन्न वाढेल.
- आयोगाने लघु-दाब-एक (निवासी) वर्गवारीमध्ये दरमहा ५०० युनिट्सपेक्षा अधिक वीज वापराकरिता वीज दर आकारणीसाठी नवीन टप्पा सुरु केला.

### टाटा पॉवर कंपनीची त्यांच्या वितरण व्यवसायाकरिता बहु-वर्षीय वीज दर चौकटी अंतर्गत आर्थिक वर्ष २००७-०८ ते २००९-१० या नियंत्रण कालावधीकरिता वार्षिक महसूली गरज आणि आर्थिक वर्ष २००७-०८ करिता वीज दर निश्चित करण्यासाठी याचिका

आयोगाने, दिनांक ३० एप्रिल, २००७ च्या आदेशाने टाटा पॉवर कंपनीच्या वितरण व्यवसायासाठी बहु-वर्षीय वीज दराच्या नियंत्रण कालावधीकरिता वार्षिक महसूली गरज निश्चित केली. तसेच आर्थिक वर्ष २००७-०८ च्या, १ मे २००७ ते ३१ मार्च, २००८ या कालावधीकरिता, वीज दर निश्चित केले. या आदेशाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे-

- आयोगाने पारित केलेल्या वीज दराच्या विनियमांनुसार टाटा पॉवर कंपनी-वितरण यांची कृती मार्गदर्शिका ठरविली.
- टाटा पॉवर कंपनी-वितरण यांनी रु. १० कोटीपेक्षा अधिक भांडवली खर्च असलेल्या प्रत्येक योजनेकरिता सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालांची छाननी करुन आयोगाने स्वतंत्रपणे मान्यता दिली होती. त्यानुसार, भांडवली खर्च आणि धंद्यात गुंतविलेले मूळ भांडवल यांचा आयोगाने विचार केला.
- "फ्रॅन्चायसीच्या माध्यमातून" "उच्च-दाब औद्योगिक आणि बिगर-औद्योगिक-सिंगल पॉइंट सप्लाय" ही स्वतंत्र वर्गवारी सुरु करण्याकरिता टाटा पॉवर कंपनीने प्रस्ताव सादर केला होता. टाटा पॉवर कंपनीने कोणत्याही नवीन ग्राहकाला वीज पुरवठा न करण्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम आदेश दिला होता. या आदेशाचा आधार घेऊन, मे. रिलायन्स एनर्जी लि.ने या प्रस्तावास हरकत घेतली. टाटा पॉवर कंपनीला वितरण परवानाधारक म्हणून कार्य करण्यास सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली नव्हती. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयापुढे असलेल्या अपीलातील कोणत्याही हक्काला बाधा न आणता, टाटा पॉवर कंपनीच्या परवान्याच्या क्षेत्रात किरकोळ विक्रीचे वीज दर आयोगाने निश्चित केले.

### राज्यांतर्गत विजेच्या उपलब्धतेवर आधारित महाराष्ट्रात वीज दराची (एबीटी) व्यवस्था

भारत सरकारने अधिसूचित केलेल्या राष्ट्रीय वीज धोरणातील खंड

५.७.१(बी) अन्वये संबंधित आयोगावर, राज्य-स्तरावर, विजेच्या उपलब्धतेवर आधारित वीज दराची (एबीटी) व्यवस्था सुरु करण्याचे बंधन आहे. या संदर्भात, राज्य विद्युत कंपन्यांनी स्थापन केलेल्या समितीने 'महाराष्ट्र राज्यात विजेच्या उपलब्धतेवर आधारित वीज दराची (एबीटी) व्यवस्था सुरु करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम' असलेला अहवाल दिनांक १ फेब्रुवारी, २००५ रोजी आयोगास मंजूरीसाठी सादर केला. दरम्यान, महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची पुनर्रचना करुन मराविमं होल्डिंग कंपनी लि., महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि., महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि., आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., अशा चार कंपन्या स्थापन केल्या. या कंपन्यांनी दिनांक ६ जून, २००५ पासून कामकाजास सुरुवात केली. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. ही महाराष्ट्राकरिता राज्य पारेषण कंपनी म्हणून काम पाहील, असे महाराष्ट्र शासनाने दिनांक १७ फेब्रुवारी, २००५च्या शासन निर्णयाद्वारे जाहीर केले. दरम्यान, समितीने सादर केलेल्या अहवालाचा आयोगाने आढावा घेतला. समितीने राज्यांतर्गत एबीटीकरिता सुचविलेले मॉडेल योग्य नसल्याचे आयोगाचे मत झाले. त्यामुळे आयोगाने या संदर्भातील विविध मुद्यांची चर्चा करुन, उपलब्ध असलेले पर्याय आणि या विविध पर्यायांची गुणवत्ता व उणीवा दर्शविणारी एक चर्चा-पत्रिका तयार करण्यात पुढाकार घेतला. आयोगाने जनतेकडून सूचना व हरकती मागवून विद्युत कंपन्यांशी विचार-विनिमय केला. त्यानुसार, राज्यात विजेचा व्यापार करणे सुलभ व्हावे आणि वीज निर्मिती साधनांचा कार्यक्षम वापर व्हावा याकरिता, विद्युत अधिनियम,२००३ च्या कलम ६६ आणि कलम १८१ च्या उप-कलम (२) च्या खंड (झेडआय) तसेच मविनिआ (राज्य ग्रीड संहिता) विनियम, २००६ खाली प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, आयोगाने दिनांक १७ मे, २००७ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशानुसार, राज्य स्तरावर राज्यांतर्गत ऊर्जेचे संतुलन व हिशोब ठेवण्याची पध्दत सुरू केली. ही पध्दत 'विजेच्या उपलब्धतेवर आधारित वीज दर' म्हणून देखील ओळखली जाते.

**टाटा पॉवर कंपनीच्या निर्मिती विभागाच्या आर्थिक वर्ष २००७-०८ मधील वार्षिक कामगिरीचा आढावा आणि आर्थिक वर्ष २००८-०९ करिता वीज दर निश्चित करण्यासाठी याचिका**

आयोगाने दिनांक २ एप्रिल, २००८ च्या आदेशान्वये टाटा पॉवर कंपनीच्या निर्मिती विभागाची वार्षिक महसूली गरज आणि १ एप्रिल, २००८ ते मार्च २००९ या कालावधीकरिता वीज दर निश्चित केले. या आदेशामध्ये खालील ठळक वैशिष्ट्यांचा समावेश होता-

- आयोगाने बहु-वर्षीय वीज दराच्या आदेशामध्ये मान्यता दिलेल्या कामगिरीच्या मार्गदर्शिकेनुसार टाटा पॉवर कंपनीच्या निर्मिती विभागाने प्रत्यक्ष केलेल्या कामगिरीचा आढावा घेतला.
- आयोगाने स्पष्ट केले की, विद्युत निर्मिती कंपन्यांकरिता भाग भांडवलावरील परतावा हा वर्षभरात भाग भांडवलात भर पडलेल्या रकमेवर द्यावयाचा नसून तो फक्त वर्षाच्या सुरुवातीस असलेल्या विनियमित भाग भांडवलावर द्यावयाचा असतो. त्यानुसार, आर्थिक वर्ष २००६-०७ च्या महसूली गरजेचे समायोजन करताना तसेच आर्थिक वर्ष २००७-०८ करिता अंतरिम समायोजन करताना आणि आर्थिक वर्ष २००८-०९ करिता वार्षिक स्थिर आकार निश्चित करताना, आयोगाने वर्षाच्या सुरुवातीस असलेल्या विनियमित भाग भांडवलावरील परतावा, मान्य केला.
- आयोगाने आर्थिक वर्ष २००६-०७ करिता नियंत्रणाधीन घटकांना झालेल्या फायदे व तोट्यांची विभागणी निश्चित केली.
- आयोगाने, टाटा पॉवर कंपनीच्या निर्मिती विभागाच्या जल-विद्युत निर्मिती केंद्रांच्या नियंत्रणापलीकडील भौतिक मर्यादा विचारांत घेऊन, आर्थिक वर्ष २००८-०९ करिता वीज निर्मितीचे फेर-अंदाज केले.

**रिलायन्स एनर्जी लि.च्या बहु-वर्षीय वीज दर चौकटी अंतर्गत आर्थिक वर्ष २००७-०८ ते २००९-१० या नियंत्रण कालावधीकरिता वार्षिक महसूली गरज आणि आर्थिक वर्ष २००७-०८ करिता वीज दर निश्चित करण्यासाठी याचिका**

आयोगाने, दिनांक २४ एप्रिल, २००७ च्या आदेशाद्वारे रिलायन्स एनर्जी लि.च्या वितरण व्यवसायासाठी बहु-वर्षीय वीज दराच्या नियंत्रण कालावधीकरिता वार्षिक महसूली गरज निश्चित केली. तसेच आर्थिक वर्ष २००७-०८ च्या, २४ एप्रिल, २००७ ते ३१ मार्च, २००८ या कालावधीकरिता, वीज दर निश्चित केले. या आदेशाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे-

- आयोगाने पारित केलेल्या वीज दराच्या विनियमांनुसार रिलायन्स एनर्जी लि. -वितरण यांची कृती मार्गदर्शिका ठरविली.
- आयोगाने, जेथे लहान प्रमाणावर औद्योगिक कार्य चालते अशा बहुतांश क्षेत्रातील लघु-दाब औद्योगिक वर्गवारीतील ग्राहकांच्या लघु-दाब-१ वर्गवारीची मर्यादा २० केडब्ल्यु इतकी वाढवून त्यांना काही प्रमाणात दिलासा दिला.
- आयोगाने असे मत व्यक्त केले की, रिलायन्स एनर्जी लि. -वितरणने त्यांची वाणिज्यिक हानि कमी करण्याची गरज असून त्याकरिता भांडवली गुंतवणुकीऐवजी कार्यक्षम व्यवस्थापनाची अधिक आवश्यकता आहे.
- आयोगाने निर्देश दिले की, रिलायन्स एनर्जी लि. -वितरणने त्यांच्या यंत्रणेतील फीडर स्तरावरील व वितरण रोहित्राच्या स्तरावरील तांत्रिक हानीचा सविस्तर अभ्यास करावा आणि आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यात याबाबतचा अहवाल सादर करावा.
- आयोगाने, नियंत्रण कालावधीच्या प्रथम वर्षात, आनुषंगिक असलेल्या कमाल मागणीच्या प्रमाणाच्या आधारे टाटा पॉवर कंपनी-निर्मितीच्या क्षमतेतील, मुंबईतील प्रत्येक वितरण परवानाधारकाच्या हिश्शाचा विचार केला आणि पुढे असे आदेश दिले की, नियंत्रण कालावधीच्या दुसऱ्या वर्षापासून, टाटा पॉवर कंपनी-निर्मितीच्या क्षमतेतील, मुंबईतील प्रत्येक वितरण परवानाधारकाच्या हिश्शाचा विचार आयोग, मान्यताप्राप्त वीज खरेदी कराराच्या आधारे करेल .
- आयोगाने असे आदेश दिले की, वितरण परवानाधारकाने देय असलेल्या प्राप्ती-कराचा विचार फक्त वितरण व्यवसायापुरताच करण्यात येईल.

# इतर आदेश

## अंदाजित खर्चापोटी एकरकमी आकारलेली रक्कम (ओआरसी) परत करणे

मविनिआ (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी) विनियम, २००५ ची अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर आणि प्रकरण क्र. २००५/७० मधील दिनांक ८ सप्टेंबर, २००६ च्या आदेशानंतर, महावितरण कंपनी ओआरसी आणि मीटरवरील खर्चाची आकारणी ग्राहकांवर करु शकत नाही. नवीन वीज जोडणी देताना वसूल केलेली ओआरसीची रक्कम आणि मीटरवरील खर्च परत मिळावा यासाठी, महाराष्ट्र राज्य वीज ग्राहक संघटनेने दिनांक २८ फेब्रुवारी, २००७ रोजी याचिका दाखल केली. त्याचप्रमाणे, समर्पित वितरण सुविधांकरिता जी रक्कम वसूल केली त्यावरील घसारा वजा जाता रकमेचा देखील परतावा दिनांक २० जानेवारी, २००५ पासून करण्यास महावितरण कंपनीला आदेश देता येतील का, याबाबत संघटनेने स्पष्टीकरण मागितले. आयोगाने तक्रार दाखल करुन घेतली व महावितरण कंपनीविरुध्द विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १४२ खाली कारवाई सुरु करण्याचे ठरविले. आयोगाने दिनांक ३ एप्रिल, २००७ रोजी सुनावणी घेतली आणि दिनांक १७ मे २००७ च्या आदेशाने महावितरण कंपनीला निर्देश दिले की, त्यांनी या आदेशातील निर्देशांची पूर्तता १५ दिवसात करावी अंन्यथा महावितरण कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक, संचालक (संचालन) आणि मुख्य अभियंता (वाणिज्य) यांचेविरुध्द विद्युत अधिनियम २००३ चे कलम १४२ खाली कारवाई करावी लागेल.

## स्पर्धात्मक बोलीच्या मार्गदर्शक सूचनांखालील उदाहरण-२ अंतर्गत दीर्घ-मुदतीच्या तत्त्वावर ४००० मेगावॅट वीज खरेदीसाठी महावितरण कंपनीची याचिका

उदाहरण-१ च्या माध्यमातून दीर्घ मुदतीच्या वीज खरेदीबाबत आपल्या दिनांक १७ ऑक्टोबर, २००६ च्या आदेशाद्वारे आयोगाने महावितरण कंपनीला निर्देश दिले की, त्यांनी भारत सरकारने जाहीर केलेल्या प्रमाण बोली दस्तावेजांतील ज्या मुद्यांपासून फारकत घेण्याचे प्रस्तावित केले असेल अशा मुद्यांची संक्षिप्त यादी त्याबाबतच्या योग्य त्या समर्थनासह सादर करावी. महावितरण कंपनीने दिनांक १९ डिसेंबर, २००६ रोजी आयोगाकडे नवीन याचिका सादर केली. सदर याचिकेत त्यांनी सादर केले की, स्पर्धात्मक बोलीच्या उदाहरण-१ मधील अनिश्चितता लक्षात घेऊन, उदाहरण-२ च्या माध्यमातून विजेची खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी, महानिर्मिती कंपनीने वीज निर्मिती केंद्रांच्या उभारणीसाठी विविध जागाही निश्चित केल्या आहेत, जसे की, धोपावे (आयात कोळशावर आधारित), तळेगाव (नैसर्गिक वायुवर आधारित), इ. या याचिकेवर आयोगाने पारित केलेल्या आदेशातील ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत-

- आयोगाने आदेशात नमूद केले की, महावितरण कंपनीची (१) ४००० मेगावॅट अतिरिक्त वीज खरेदीची विनंती व (२) स्पर्धात्मक बोली मार्गदर्शन सूचनांमधील उदाहरण-२ खाली बोली प्रक्रिया सुरु करण्यासाठी परवानगी देण्याची विनंती, आयोग सध्या मान्य करु शकत नाही. महावितरण कंपनीला आयोगाने असेही निर्देश दिले की त्यांनी वीज खरेदीची सविस्तर योजना, स्पर्धात्मक बोली मार्गदर्शन सूचनांमधील उदाहरण-२ माध्यमातून करावयाच्या वीज खरेदीच्या तपशीलवार वैशिष्ट्यांसह (स्पेसिफिकेशन्स), सादर करावी.
- आयोगाने निर्देश दिले की, इंधन व वाहतुक व्यवस्था, पर्यावरणासंबंधीची ना हरकत प्रमाणपत्रे, अंदाजित खर्च, जोखीमेची विभागणी, व अशा इतर महत्त्वाच्या घटकांसह एक सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करावा.
- आयोगाने असे मत व्यक्त केले की, सविस्तर प्रकल्प अहवाल आणि प्रमाण बोली दस्तावेजांच्या संदर्भात बोली दस्तावेजांमधील ज्या मुद्यांपासून फारकत घेण्याचे प्रस्तावित केले असेल अशा मुद्यांची माहिती सादर केल्यानंतरच आयोगाच्या मान्यतेचा प्रश्न उद्‌भवेल व तसेच याकरिता जाहीर सुनावणी देखील घ्यावी लागेल.

## सिक्कीम येथील ५०० मेगावॉट टीस्टा-६ जल विद्युत प्रकल्पाकडे असलेल्या विक्रीयोग्य विजेची खरेदी करण्यासाठी लॅन्को एनर्जी प्रायव्हेट लि. यांच्याशी केलेल्या वीज खरेदी करारास मान्यता देण्यासाठी महावितरण कंपनीची याचिका

लॅन्को एनर्जी प्रायव्हेट लि. यांच्या टीस्टा येथील ५०० मेगावॉट (४ x १२५ मेगावॅट) जल विद्युत प्रकल्पातील विक्रीयोग्य विजेची खरेदी करण्यासाठी, दीर्घ मुदतीच्या वीज खरेदी करारास मान्यता देण्याकरिता, विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६१ ते ६४ खाली, महावितरण कंपनीने आयोगाला दिनांक ३० ऑगस्ट, २००६ रोजी याचिका सादर केली. या प्रकरणी, आयोगाने दिनांक ९ जानेवारी, २००७ रोजी जाहीर सुनावणी घेतली. नियामक प्रक्रियेचे उचित पालन केल्यानंतर आणि हरकती/सूचना विचारात घेऊन, आयोगाने दिनांक २६ जून, २००७ रोजी आदेश पारित केले. या आदेशाद्वारे, आयोगाने सूचविलेले बदल समाविष्ट करण्याच्या अटीवर, लॅन्को एनर्जी प्रायव्हेट लि. व महावितरण कंपनी यांच्यातील वीज खरेदी करारास मंजूरी दिली. त्याचप्रमाणे, वीज खरेदी करावयाच्या दरास तत्त्वत: मान्यता दिली.

## महाराष्ट्रात राज्यांतर्गत विजेचा व्यापार करण्यासाठी मविनिआ (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४ खाली परवाना मिळण्याकरिता मेसर्स ग्लोबल एनर्जी लिमिटेड यांनी केलेला अर्ज

मेसर्स ग्लोबल एनर्जी लिमिटेड यांनी मविनिआ (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४ खाली महाराष्ट्रात वार्षिक १०० दशलक्ष युनिट्सपर्यंत राज्यांतर्गत विजेचा व्यापार करण्यासाठी परवाना मिळण्याकरिता दिनांक ५ सप्टेंबर, २००६ रोजी अर्ज सादर केला. आयोगाने या प्रकरणी दिनांक १७ जुलै, २००७ रोजी सुनावणी घेतली आणि दिनांक २८ सप्टेंबर, २००७ रोजी आदेश पारित केले. मविनिआ (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४ खाली राज्यांतर्गत विजेचा व्यापार करण्याकरिता अर्हता प्राप्त करण्यासाठी आवश्यक त्या तांत्रिक, वाणिज्यिक व आर्थिक गरजांची पूर्तता मेसर्स ग्लोबल एनर्जी लिमिटेडने केली असल्याचे मत व्यक्त करुन आयोगाने मेसर्स ग्लोबल एनर्जी लिमिटेडला महाराष्ट्रात दर वर्षी १०० दशलक्ष युनिट्सपर्यंत राज्यांतर्गत विजेचा व्यापार करण्याचा परवाना मंजूर केला.

**बेस्ट आणि टीपीसी यांच्यातील सुधारित वीज खरेदी करारास मंजूरी देण्याकरिता बेस्टची याचिका; टीपीसीच्या विद्युत निर्मिती विभागाकडून त्यांच्याच वितरण विभागास करावयाच्या प्रस्तावित वीज निर्मिती क्षमता वाटपास मंजूरी देण्याकरिता टीपीसीची याचिका; आणि विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६ (१) (एफ) मधील तरतुदींनुसार अभिनिर्णयाकरिता आरईएलने उपस्थित केलेला वाद**

वितरण परवानाधारक आणि विद्युत निर्मिती कंपन्या यांच्यामध्ये मान्यताप्राप्त वीज खरेदी करार नसणे आणि वीज पुरवठ्यातील तूट लक्षात घेऊन आयोगाने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम २३ खालील अधिकारांचा वापर करुन आदेश दिले. या आदेशाद्वारे निर्देश देण्यात आले की, वितरण परवानाधारकांनी आर्थिक वर्ष २००६-०७ मधील आनुषंगिक नसलेल्या कमाल मागणीच्या हिश्श्याच्या आधारे आणि आर्थिक वर्ष २००७-०८ मधील आनुषंगिक असलेल्या कमाल मागणीच्या हिश्श्याच्या आधारे, उपलब्ध वीज निर्मिती क्षमता विभागून घ्यावी. त्यानंतर, बेस्ट आणि टीपीसी-वितरण यांनी मविनिआ (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ च्या विनियम २४ मधील तरतुदींखाली, सन २००६ च्या अनुक्रमे याचिका क्र. ८७ व ८८, वेगवेगळ्या याचिका सादर केल्या. त्यामध्ये, टीपीसी-निर्मिती बरोबर बेस्टने करावयाच्या वीज खरेदी करारास तसेच टीपीसी-निर्मिती बरोबर टीपीसी-वितरणने करावयाच्या वीज खरेदीच्या व्यवस्थेस मान्यता देण्याकरिता, मागणी करण्यात आली. आरईएलने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६(१)(एफ) मधील तरतुदींखाली याचिका क्र. २००७/३० सादर केली. या तीनही याचिकांमध्ये एकमेकांशी निगडीत काही बाबी असल्यामुळे त्या एकत्रित करण्यात आल्या. नियामक प्रक्रियेचे उचित पालन केल्यानंतर आयोगाने दिनांक ६ नोव्हेंबर, २००७ रोजी एकत्रित आदेश पारित केला. या आदेशातील ठळक वैशिष्ट्यांमध्ये खालील बाबींचा समावेश होता:-

- आयोगाने स्पष्ट केले की, वीज निर्मिती केंद्रे मुंबईतच किंवा महाराष्ट्रातदेखील असण्याची गरज नाही आणि वितरण परवानाधारक आणि वीज पुरवठादार यांच्यात झालेल्या दीर्घ-मुदतीच्या करारांच्या संदर्भात विजेची उपलब्धतता विचारात घेतली जाईल.
- आयोगाने टीपीसी-निर्मिती व बेस्ट यांच्यातील ८०० मेगावॅट वीज खरेदीच्या करारास त्याचप्रमाणे टीपीसी-निर्मिती व टीपीसी-वितरण यांच्यातील ४७७ मेगावॅट वीज खरेदीच्या व्यवस्थेस, वितरण परवानेधारकांची अंदाजित मागणी आणि आयोगाच्या विनियमांनुसार करारांतर्गत असलेल्या तरतुदींच्या आधारे, मान्यता दिली.
- आरईएल-वितरणला, वीज निर्मिती कंपन्या आणि अन्य स्रोतांकडून वीज प्राप्त करुन घेण्यासाठी दीर्घ-मुदतीचा वीज खरेदी करार तसेच त्यांच्या स्वत:च्या वीज निर्मिती व्यवसायाकडून-म्हणजेच आरईएल-निर्मितीकडून-वीज प्राप्त करुन घेण्याकरिता केलेल्या वीज खरेदीच्या व्यवस्थेची माहिती, या आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत आयोगाच्या मान्यतेसाठी दाखल करण्याचे निर्देश दिले.

**मविनिआ (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ च्या कलम ४५ आणि ८५ खाली विजेचे वहन करणे शक्य व्हावे यासाठी पायाभूत सोयी/सुविधा विकसित करण्याकरिता महापारेषण कंपनीच्या प्रस्तावास तत्त्वत: मान्यता देणे**

राज्यात नव्याने उभारण्यात येणाऱ्या वीज निर्मिती प्रकल्पांमधून, विजेचे वहन करणे शक्य व्हावे यासाठी पायाभूत सोयी/सुविधा तसेच समर्पित पारेषण वाहिन्या आणि अन्य निगडीत सोयी सुविधा विकसित करण्यासाठी तत्त्वत: मान्यता मिळण्यासाठी महापारेषण कंपनीने दिनांक २४ जुलै, २००७ रोजी एक याचिका, मविनिआ (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ च्या विनियम ४५ आणि ८५ खाली, सादर केली. आयोगाने या प्रकरणी, दिनाक ११ सप्टेंबर, २००७ रोजी जाहीर सुनावणी घेतली. या सुनावणीत, राज्य पारेषण कंपनी या नात्याने महापारेषण कंपनीने असे प्रतिपादन केले की, (१) महानिर्मिती कंपनी, (२) स्पर्धात्मक बोलीद्वारे निवडलेले विविध खाजगी विकासक, (३) व्यापारी प्रकल्पांचे विकासक, यासारख्या विविध विद्युत कंपन्यांनी विद्युत निर्मिती क्षमतेत भर घालण्याचे प्रकल्प मोठ्या प्रमाणावर हाती घेतल्यामुळे, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा बळकट करणे गरजेचे आहे. नियामक प्रक्रियेचे उचित पालन केल्यावर आणि या प्रकरणी प्राप्त झालेल्या सर्व हरकती व अभिप्राय विचारात घेऊन, आयोगाने दिनांक १३ नोव्हेंबर, २००७ रोजी आदेश पारित केले. या आदेशातील ठळक वैशिष्ट्यांमध्ये खालील बाबींचा समावेश होता:-

- आयोगाने असे निर्देश दिले की, विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ९ व १० खाली उल्लेख केल्यानुसार समर्पित पारेषण वाहिन्या, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी थेट पारेषण करण्यासाठी होत्या. अशा पारेषण वाहिन्या ह्या विशेषत: राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा भाग नसून, त्या विद्युत निर्मिती कंपनीद्वारे उभारावयाच्या पायाभूत पारेषण सुविधांचा एक भाग ठरतात. तसेच, याबाबतीत, वीज वाहून नेण्याकरिता महापारेषण कंपनीने अशा समर्पित पारेषण वाहिन्या उभारण्याचे काम हे, निर्मिती कंपन्या किंवा व्यापारी प्रकल्पांच्या विकासकांच्या वतीने केले जात असल्याचे मानले जाण्याची शक्यता आहे.
- आयोगाने स्पष्ट केले की, अशा प्रकल्पांकरिता विजेच्या वहनाच्या व्यवस्थेसह पारेषण वाहिन्या या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा एक भाग होतात, ज्यामागची कारणमीमांसा आयोगाने प्रकरण क्र. २००५/५८ मधील दिनांक २७ जून, २००६ च्या पारेषण दराच्या चौकटी संबंधीच्या आदेशात सविस्तरपणे मांडली आहे. आयोगाने या बाबतीत पुढे असेही स्पष्ट केले की, पारेषण पायाभूत सुविधांचा विकास हा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा एक भाग असल्यामुळे त्यावर झालेला खर्च, पारेषण पायाभूत सुविधा कोणीही विकसित केल्या तरी तो, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या एकूण खर्चाचा एक भाग होणे आवश्यक आहे आणि त्याची वसूली आयोगाने पारेषण दराच्या चौकटी संबंधीच्या आदेशात विशद केलेल्या तत्त्वांनुसार करण्यात येईल.
- आयोगाने स्पष्ट केले की, वीज उत्पादकांनी निर्माण केलेल्या विजेपैकी जितक्या विजेचे वहन राज्याबाहेर करण्यात आले असेल तितक्या विजेवर पारेषण आकार लागू होतील. व्यापारी तत्त्वावरील

वीज उत्पादकांकडून केलेल्या अशा वसुलीचे समायोजन, राज्यातील पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांकडून वसूल करावयाच्या एकूण पारेषण यंत्रणा खर्चात, करण्यात येईल.

### (१) मेसर्स पूर्ती साखर कारखाना लि. यांनी अल्प-मुदतीच्या तत्त्वावर राज्यांतर्गत मुक्त प्रवेशासाठी केलेली याचिका आणि (२) महावितरण कंपनीच्या मान्यतेशिवाय अन्य व्यक्ती/संस्थेला विजेची विक्री करण्यापासून मेसर्स पूर्ती साखर कारखाना लि. यांना प्रतिबंध करण्याकरिता निर्देश देण्यासाठी महावितरण कंपनीने केलेली याचिका

मेसर्स पूर्ती साखर कारखाना लि. यांनी पारेषण मुक्त प्रवेशासंबंधीचा वाद, देयक तयार करण्याची पध्दत यावर अभिनिर्णय आणि उचित निर्देश मिळण्यासाठी दिनांक १८ सप्टेंबर, २००७ रोजी याचिका सादर केली. कारखान्यास पारेषण मुक्त प्रवेश देण्याकरिता महावितरण आणि महापारेषण कंपनीला अंतरिम निर्देश देण्यात यावेत म्हणून कारखान्याने आयोगाला विनंती केली होती. त्यानंतर, महावितरण कंपनीने दिनांक ५ नोव्हेंबर, २००७ रोजी याचिका दाखल करुन सदर कारखान्याला मुक्त प्रवेश देऊ नये आणि महावितरण कंपनी व सदर कारखाना यांच्यात झालेल्या वीज खरेदी कराराचे पालन होईल याची खात्री करण्याकरिता महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्रास निर्देश देण्याची विनंती केली. या प्रकरणी, आयोगाने दिनांक ६ नोव्हेंबर, २००७ रोजी जाहीर सुनावणी घेतली. या सुनावणीत आयोगाने कारखान्यास निर्देश दिले की, त्यांनी कोणत्याही परिस्थितीत वीज निर्मिती थांबवू नये. आयोगाने दिनांक १७ डिसेंबर, २००७ रोजी आपला आदेश पारित केला आणि असे मत व्यक्त केले की, वीज खरेदी करारातील खंड ७.४ लागू होत नाही कारण सदर कारखान्याने सुरुवातीपासूनच महावितरण कंपनीला विजेची विक्री करुन तसेच वीज खरेदी करारातील खंड ७ नुसार देयके तयार केली आहेत. त्यामुळे, करारबध्द वाणिज्यिक विजेकरिता देयक तयार केलेले नसून ते चाचणी काळात झालेल्या वीज निर्मितीतून केलेल्या वीज पुरवठ्यासाठी तयार केले असल्याचा कारखान्याचा दावा फोल ठरतो. आयोगाच्या दिनांक १५ जुलै, २००२ च्या आदेशासह दिनांक १६ ऑगस्ट, २००२ च्या सविस्तर आदेशानुसार, चाचणी काळात निर्माण झालेल्या विजेचा दर, मागील आर्थिक वर्षातील सरासरी वसूली दराच्या ९० टक्के इतका आहे. आयोगाला दिसून आले की, कारखान्याने वाणिज्यिक तत्त्वावर वीज निर्मिती सुरु केल्याची तारीख घोषित करावयाची होती, परंतु कारखान्याने तसे केलेले नाही. त्यामुळे आयोगाने निर्णय दिला की, कारखान्याने महावितरण कंपनीला विजेची विकी केली, देयकात रु. ३.०५ प्रति युनिट या दराने आकारणी केली व त्याप्रमाणे वसूली केली, आणि करार समाप्तीची नोटीस कारखान्याने दिली नाही, यामुळे वीज खरेदी करार पुढे चालू राहतो. या पार्श्वभूमीवर, वीज खरेदी करारातील जबाबदाऱ्या नाकारण्याचा अधिकार कारखान्याला राहत नाही.

### नियामक दायित्त्व आकारांच्या (आरएलसी) रकमा परत करणे आणि आयोगाच्या या संबंधातील निर्देशांची अंलबजावणी करणे

आयोगाने आपल्या यापूर्वीच्या आदेशांद्वारे महावितरण कंपनीला (पूर्वीच्या मराविमंला) ग्राहकांकडून वसूल केलेल्या आरएलसीच्या रकमा त्यांना परत करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर, प्रकरण क्र २००६/६५ मध्ये बहु-वर्षीय वीज दराबाबतचा दिनांक १८ मे, २००७ चा आदेश पारित केल्यावर आरएलसी रकमा परत केल्या जात नाहीत, अशी निवेदने ग्राहकांकडून आयोगास प्राप्त झाली. महावितरण कंपनीने स्पष्टीकरण याचिका दाखल केली. या याचिकेवर, आयोगाने प्रकरण क.२००६/६५ आणि प्रकरण क्र. २००७/२६ मध्ये दिनांक २४ ऑगस्ट, २००७ चा स्पष्टीकरणात्मक आदेश पारित केला. या आदेशात, वेगवेगळ्या ग्राहक वर्गवारींकडून वसूल केलेली एकूण आरएलसी रक्कम; महावितरण कंपनीने आरएलसी रकमा परत करण्याची पध्दत; त्याची सविस्तर परिगणना आणि परत करण्याचा कालावधी, नमूद करण्यात आला होता. परिणामी, चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रिज असोसिएशन ॲन्ड ॲग्रिकल्चर आणि इस्पात इंडस्ट्रिज लि. यांनी याचिका दाखल केल्या. या याचिकांमध्ये आयोगाच्या पूर्वीच्या निर्देशांप्रमाणे महावितरण कंपनीने आरएलसी रकमा ग्राहकांना परत करण्यासाठी आयोगाने महावितरण कंपनीस निर्देश देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यामध्ये असेही नमूद करण्यात आले होते की, आयोगाने दिनांक १० मार्च, २००४ (प्रकरण क्र. २००३/२), दिनांक १८ मे, २००७, (प्रकरण क्र. २००६/६५) आणि दिनांक २४ ऑगस्ट, २००७ च्या (प्रकरण क्र. २००६/६५ आणि प्रकरण क्र. २००७/२६) आदेशांमध्ये स्पष्टपणे दिलेल्या निर्देशांची महावितरण कंपनीने अंमलबजावणी केलेली नाही. त्यासाठी महावितरण कंपनीला विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४२ खाली दंड करावा, अशी चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रिज असोसिएशन ॲन्ड ॲग्रिकल्चरने विनंतीही केली. इस्पात इंडस्ट्रिज लि. यांनी कलम १४२ खाली कारवाई करण्याची मागणी केली नव्हती. या प्रकरणी, आयोगाने दिनांक १८ डिसेंबर, २००७ रोजी सुनावणी घेतली. या सुनावणीच्या वेळी, महावितरण कंपनीने विनंती केली की, आयोगाने आरएलसी रकमा परत करण्याबद्दल दिलेल्या निर्देशांविरुध्द महावितरण कंपनीने विद्युत अपील न्यायाधिकरणापुढे अपील केले असल्याने, या प्रकरणातील याचिका व कामकाज स्थगित ठेवण्यात यावे. आयोगाने आरएलसी रकमा परत करण्याबद्दल दिलेल्या निर्देशांविरुध्द अपील केले असल्याने आयोगाचे निर्देश व्यर्थ झाले असे मानणे किंवा ते स्थगित ठेवण्याचे महावितरणचे म्हणणे स्वीकारण्यास आयोगाने नकार दिला. आयोगाने पुढे असेही मत व्यक्त केले की, विद्युत अपील न्यायाधिकरणापुढील त्यांच्या अपीलाचा महावितरण कंपनी तत्परतेने पाठपुरावा करीत नसून वेळोवेळी पुढील तारीख मागून प्रकरण प्रलंबित ठेवीत आहे. आयोगाने पुढे असेही मत व्यक्त केले की, आयोगाने पारित केलेल्या कोणत्याही आदेशाविरुध्द विद्युत अधिनियम २००३च्या कलम १११ खाली विद्युत अपील न्यायाधिकरणाकडे अपील करता येते. तथापि अशा आदेशाला विद्युत अपील न्यायाधिकरणाने स्थगिती दिली नसल्यास, नाकारला नसल्यास किंवा त्यात दुरुस्ती केली नसल्यास, या आदेशाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. आयोगाने असे निर्देश दिले की, आयोगाने दिलेल्या आदेशांचे किंवा निर्देशांचे पालन करणे, आदर करणे, महावितरण कंपनीला कायद्यानुसार बंधनकारक आहे. आयोगाने महावितरण कंपनीला निर्देश दिले की, त्यांनी ग्राहकांच्या पुढील देयकात आरएलसीच्या उचित रकमांचे समायोजन करुन परत कराव्यात; अन्यथा महावितरण कंपनीला विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४२ खाली कारणे दाखवा नोटीस देण्यात येईल.

### उदाहरण-१ बोली प्रक्रिये अंतर्गत दीर्घ-मुदतीच्या वीज खरेदीकरिता सुधारित बोली दस्तावेजांना मान्यता देणे

उदाहरण-१ बोली प्रक्रिये अंतर्गत २००० मेगावॉटची दीर्घ-मुदतीच्या वीज खरेदी करण्यासाठी सुधारित बोली दस्तावेजांना मान्यता देण्याकरिता महावितरण कंपनीने दिनांक ८ जुलै , २००७ रोजी याचिका सादर केली. या प्रकरणी, आयोगासमोर दिनांक ११ सप्टेंबर, २००७ रोजी प्रकरणाची

तांत्रिक तपासणी करण्यासाठी बैठक झाली आणि दिनांक ९ जानेवारी, २००८ रोजी जाहीर सुनावणी घेतली. नियामक प्रक्रियेचे उचित पालन करुन, आयोगाने दिनांक २४ जानेवारी, २००८ रोजी आदेश पारित केले.

**पुणे शहरातील भार नियमन शिथील करण्यासाठी झालेल्या अतिरिक्त खर्चाची वसूली रिलायेबिलिटी आकार म्हणून करण्याबाबतच्या महावितरण कंपनीच्या प्रस्तावाबाबत भारतीय उद्योग महासंघाचा (सीआयआय) अर्ज**

भारतीय उद्योग महासंघ-पश्चिम विभाग यांनी दिनांक २४ मार्च, २००८ रोजी याचिका सादर केली. या याचिकेत अशी विनंती केली की, अंशत: मुक्त प्रवेश किंवा फ्रॅन्चायसी नियुक्तीच्या स्वरुपात जोपर्यंत पर्यायी मॉडेलची स्थापना होत नाही तोपर्यंत, पुण्यातील जैसे-थे परिस्थिती चालू ठेवावी. या बाबतीतील निकड लक्षात घेऊन, आयोगाने दिनांक ३१ मार्च, २००८ रोजी आदेश पारित केले. या आदेशांद्वारे महावितरण कंपनीला निर्देश देण्यात आले की, जून २००६ ते मार्च, २००८ या एकवीस (२१) महिन्यांच्या कालावधीत वीज प्राप्तीकरिता झालेला खर्च आणि पुणे शहरातील ग्राहकांकडून वसूल केलेल्या 'रिलायेबिलिटी आकारां'ची सविस्तर माहिती देणारे लेखापरिक्षित लेखे सादर करावेत. आयोगाने असेही आदेश दिले की, एखाद्या विशिष्ट भागातील भार नियमन शिथील करण्यासाठी ग्रीडमधील वीज वळविणे बेकायदेशीर होते.

आयोगाने असेही सूचित केले की, फ्रॅन्चायसीची नियुक्ती होईपर्यंत आवश्यक कामे चालू ठेवण्यासाठी महावितरण कंपनीला अंतरिम फ्रॅन्चायसीची नियुक्ती करावी लागेल.

**वाणिज्यिक इमारती/औद्योगिक समुहांना मिश्र भाराकरिता एकाच ठिकाणी विद्युत पुरवठा करण्याकरिता मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲन्ड ॲग्रिकल्चर (एमसीसीआयए) यांची याचिका - अंतरिम आदेश**

आयोगाने, राज्यातील सर्व वितरण परवानाधारकांची आर्थिक वर्ष २००५-०६ करिता वार्षिक महसूली गरज (एआरआर) आणि आर्थिक वर्ष २००६-०७ करिता वीज दर निश्चित करणारे आदेश पारित केले. या आदेशांत असे निर्देश दिले होते की, एकाच ठिकाणी वीज पुरवठा घेऊन उच्च-दाब औद्योगिक आणि वाणिज्यिक वर्गवारीतील जे ग्राहक त्याच जागेतील अन्य ग्राहकांना वेगवेगळ्या कारणांसाठी विजेचे वितरण करतात, अशा अन्य ग्राहकांना ओळखणे व त्यांच्यासाठी स्वतंत्र मीटर्स देण्याच्या मर्यादा विचारात घेऊन, आयोगाच्या आदेशाच्या/आदेशांच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या संक्रमण कालावधीत, त्या वर्गवारीखाली आकारणी करण्यात येईल. त्यानंतर, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲन्ड ॲग्रिकल्चर (एमसीसीआयए) यांनी दिनांक २८ नोव्हेंबर, २००७ रोजी याचिका सादर केली. या याचिकेत त्यांनी आयोगाच्या निर्देशांचा संदर्भ दिला की ज्यामध्ये, वरील वर्गवारीत असणाऱ्या ग्राहकांपैकी ज्यांना एकाच ठिकाणाहून विद्युत पुरवठा घ्यावयाचा आहे त्यांना, फ्रॅचायसीच्या मार्गाने जावे लागेल किंवा संबंधित वर्गवारीखाली वैयक्तिक जोडण्या घ्याव्या लागतील, असे नमूद करण्यात आले होते. तसेच संस्थेने कार्यान्वयनासंबंधीच्या अनेक मुद्यांवर स्पष्टीकरण मागितले ज्यामुळे वरील निर्देशांची उद्दिष्टपूर्ती होण्यास मदत होणार आहे. या प्रकरणी, आयोगाने दिनांक २० डिसेंबर, २००७ रोजी सुनावणी घेतली. या सुनावणीत वितरण परवानाधारकांना कार्यकारी गट स्थापण्याचे आणि करारांतर्गत मागणी व व्होल्टेज-पातळीच्या कृतीच्या मानकांचे पालन करीत असतानाच, उच्च-दाब वीज दर लागू करताना आवश्यक असणाऱ्या इतर बाबींना धक्का न लावता, वाणिज्यिक इमारतीमधील उच्च-दाब ग्राहकांना सामाईक रोहित्रामधून कशा प्रकारे विजेचा पुरवठा करता येईल, याबाबत सूचना सादर करण्याचे निर्देश दिले. दरम्यान, एमसीसीआयएने, तातडीने दिलासा मागण्यासाठी, दिनांक १९ मार्च, २००८ रोजी अर्ज सादर केला. या अर्जात एमसीसीआयएने नमूद केले की, हे प्रकरण आयोगापुढे सुनावणीसाठी प्रलंबित असले तरी महावितरण कंपनीने याबाबतीत पुढे जाऊन दिनांक ३१ डिसेंबर, २००७ रोजी तात्पुरता निर्धारण आदेश व रु. १,३०,०७,०१६/- चे देयक, संस्थेच्या एका सभासदाला विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १२६ खाली पाठविले. हे दिनांक ३१ डिसेंबर, २००७ चे तात्पुरते निर्धारण देयक पाठविण्यामागचे कारण असे होते की, संबंधित ग्राहकाने महावितरण कंपनीला न कळविता, निरनिराळ्या ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्याकरिता व त्यांच्याकडून आकार वसूल करण्यासाठी, सब-मीटर्स बसविली होती व अशा रितीने संबंधित ग्राहक हा विजेचा अनधिकृतपणे वापर करीत होता. या प्रकरणी, नियामक प्रक्रियेचे उचित पालन केल्यावर, आयोगाने दिनांक २६ मार्च, २००८ च्या अंतरिम आदेशाने असा निर्णय दिला की, ज्या उच्च- दाब औद्योगिक व वाणिज्यिक ग्राहकांनी निरनिराळ्या व्यक्तींना वीज पुरवठा करण्याकरिता सब-मीटर्स बसविली आहेत त्यांचा वीज पुरवठा खंडित केल्यास त्यांच्यावर मोठा अन्याय होईल आणि या प्रकरणी जोपर्यंत सविस्तर अभ्यास केला जात नाही तोपर्यंत, सर्व वितरण परवानाधारकांवर अशा ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित न करण्याचे निर्बंध घातले.

**प्रकरण क्र. २००७/२६ आणि प्रकरण क्र. २००६/६५ मधील दिनांक २४ ऑगस्ट, २००७ च्या आदेशासह दिनांक १० मार्च, २००४, दिनांक २० ऑक्टोबर, २००६ आणि दिनांक १८ मे, २००७ च्या आदेशांतील, नियामक दायित्त्व आकारांशी (आरएलसी) संबंधित असलेल्या भागाचे, पुनर्विलोकन करण्यासाठी महावितरण कंपनीची याचिका**

आयोगाने, प्रकरण क्र. २००७/२६ आणि प्रकरण क्र. २००६/६५ मधील दिनांक २४ ऑगस्ट, २००७ च्या स्पष्टीकरणात्मक आदेशासह दिनांक १० मार्च, २००४ (प्रकरण क्र. २००३/२), दिनांक २० ऑक्टोबर, २००६ (प्रकरण क्र. २००५/५४) आणि दिनांक १८ मे, २००७ (प्रकरण क्र. २००६/६५) च्या आदेशांद्वारे आरएलसी आकारांचा परतावा करण्यासंबंधीचे निर्देश दिले होते. महावितरण कंपनीने याविरुध्द विद्युत अपील न्यायाधिकरणापुढे अपील क्रमांक एएफआर २००७/१३८६ दाखल केले. विद्युत अपील न्यायाधिकरणाने दिनांक २३ जानेवारी, २००८ रोजी दिलेल्या आदेशांनुसार, महावितरण कंपनीने दिनांक २४ सप्टेंबर, २००७ रोजी पुनर्विलोकन याचिका सादर केली. या याचिकेमध्ये उपरोक्त आदेशांतील, नियामक दायित्त्व आकारांशी (आरएलसी) संबंधित असलेल्या भागाचे, पुनर्विलोकन करण्यासाठी विनंती केली होती. या संदर्भात, आयोगाने दिनांक ११ मार्च, २००८ रोजी जाहीर सुनावणी घेतली. नियामक प्रक्रियेचे उचित पालन करुन, आयोगाने दिनांक २ एप्रिल, २००८ रोजी आदेश पारित केला. जेव्हा हानि कमी करण्यात येईल तेव्हाच दिनांक १० मार्च, २००४ चा

आदेश कार्यान्वित होणार असल्याने हा आदेश सशर्त असल्याचा महावितरण कंपनीचा युक्तिवाद, आयोगाने आदेशात मान्य केला नाही. महावितरण कंपनीने सादर केले की, डिसेंबर, २००३ ते सप्टेंबर, २००६ दरम्यान वसूल केलेला आरएलसी आकार महसूल म्हणून मानण्यात आला होता, तथापि दिनांक १८ मे, २००७ च्या आदेशात आरएलसी परत करण्याचे निर्देश देताना आयोगाने आरएलसी आकार, खर्च म्हणून विचारात घेतला नव्हता; ज्यामुळे आर्थिक वर्ष २००७-०८ ची वार्षिक महसूली गरज ही रु. ५०० कोटीने कमी केली गेली होती. आयोगाने महावितरण कंपनीचे म्हणणे विचारात घेऊन असे मत मांडले की, प्रकरण क्र. २००७/२६ आणि प्रकरण क्र. २००६/६५ मधील दिनांक २४ ऑगस्ट, २००७ च्या आदेश आणि प्रकरण क्र. २००६/६५ मधील दिनांक १८ मे, २००७ च्या आदेशांतील, आरएलसीचा परतावा हा वार्षिक महसूली गरजेचा एक भाग म्हणून विचारात न घेण्यात आलेल्या भागाचे, पुनर्विलोकन करण्यास पुरेसे कारण आहे. आयोगाने असे मत व्यक्त केले की, ज्या वर्गवारीतील विद्युत ग्राहकांकडून वीज दरांमध्ये अर्थ-सहाय्य दिले जाते त्या ग्राहकांकडून आरएलसी वसूल केला होता. त्यांना आरएलसीच्या रकमा परत करणे आवश्यक असल्याने आरएलसी रकमांच्या प्रमाणात त्या ग्राहकांचे विजेचे दर कमी करावेत आणि त्याच वेळी वार्षिक महसूली गरजेमध्ये या रकमांचा समावेश करण्यास महावितरण कंपनीला परवानगी देण्यात आली ज्यामुळे आरएलसीचा भार सर्व ग्राहकांना समानपणे सहन करावा लागेल.

## आयोगाचे निर्देश- अनुपालन संनियंत्रण कक्ष

आयोगाने दिलेल्या निर्देशांचे आणि विनियमात उल्लेखलेल्या तरतुदींचे राज्यातील विद्युत कंपन्या आणि संस्था यांच्याकडून अनुपालन होत असल्याची खात्री करणे, हे आयोगाच्या अनुपालन संनियंत्रण कक्षाचे प्रमुख कार्य आहे.

### वीज निर्मिती केंद्रांच्या कामगिरीचे संनियंत्रण

राज्यातील वीज निर्मितीमध्ये औष्णिक वीज निर्मिती केंद्रांचा सिंहाचा वाटा आहे. त्यामुळे आयोगाने औष्णिक वीज निर्मिती केंद्राकरिता महत्वाची कृती मापन/मानके निश्चित करुन त्यानुसार कार्यक्षमतेचा दर्जा राखण्याचे निर्देश दिले आहेत. आयोगाच्या निर्देशांचे पालन होत असल्याची खात्री करण्याकरिता राज्यातील औष्णिक केंद्रांनी पाठविलेल्या द्वै-मासिक प्रमाणित माहितीची छाननी संनियंत्रण कक्ष करते.

राज्यातील विविध औष्णिक वीज निर्मिती केंद्रांमधील उष्णता दर मापनाच्या संनियत्रण प्रक्रियेकरिता सध्या वापरात असलेली मूळ पध्दत जाणून घेण्यासाठी, या प्रक्रियेचे आरेखन करण्याचा कार्यक्रम आयोगाच्या अनुपालन संनियंत्रण कक्षाने सुरु केला. आरेखन करण्याच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून यासंबंधात घेण्यात आलेल्या चर्चा-सत्रांमध्ये, काही केंद्रांनी अवलंबलेल्या प्रक्रियांमधील उणीवा समोर आल्या तर अधिक चांगले व्यवस्थापन असलेल्या केंद्रांनी अवलंबलेल्या आधुनिक तंत्र आणि प्रमाणित कार्यपध्दतींची देखील माहिती मिळाली, ज्यामुळे सुधारणा करण्यासाठी मार्ग व संधीचे दरवाजे खुले झाले.

### पारेषण यंत्रणेच्या कामगिरीचे संनियंत्रण

आयोगाने पारित केलेल्या आदेशांन्वये राज्याकरिता पारेषण दराबाबतच्या धोरणाची चौकट तयार झाली आहे आणि घाऊक प्रमाणावर विजेचे हस्तांतरण व देवाणघेवाणीचे वाणिज्यिक हिशोब पूर्ण करण्याची कार्यपध्दती ठरविण्यात आली. मीटरसंबंधीची संहिता तयार करणे, उपलब्धतेवर आधारित वीज दरासाठी मूलभूत निकष स्पष्ट करणे आणि विजेच्या संतुलन व हिशोबपूर्तीची (बॅलन्सिग अँड सेटलमेंट) अंतरिम तसेच अंतिम पध्दत ठरविणे, यासाठी आयोगाने पारित केलेल्या पारेषण दराच्या विविध आदेशांतील निर्देशांद्वारे मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. अनुपालन संनियंत्रण कक्षाने राज्य पारेषण कंपनी आणि राज्य भार प्रेषण केंद्रास मीटरसंबंधीची संहिता, अनुसूची व प्रेषण संहिता आणि घाऊक वीज खरेदी करार, वीज जोडणी संहिता, इ. महत्वाचे दस्तावेज तयार करण्यास मार्गदर्शन केले व मदत दिली. विजेच्या संतुलन व हिशोबपूर्तीच्या पध्दतीचे काम सुरळीत व्हावे यासाठी देखील कक्षाने मदत केली.

### पारेषण यंत्रणेतील हानि

संपूर्ण वर्षाकरिता नमुना आकडेवारीचा वापर करुन, राज्याच्या वीज जाळ्यातील पारेषण हानि, संगणकाद्वारे निर्धारण करण्यासाठी आयोगाने सीपीआरआय (सेंट्रल पॉवर रिसर्च इन्स्टिट्युट) संस्थेच्या सेवा सल्लागार म्हणून घेण्यासाठी संस्थेशी करार केला. सल्लागाराने सादर केलेल्या अहवालाची संनियंत्रण कक्षाने छाननी केली आणि राज्यातील विविध पारेषण व वितरण कंपन्यानी त्यांच्या कामगिरीविषयक दिलेल्या वेगवेगळ्या आकडेवारीच्या माहितीची तुलना, सलागारांनी दिलेल्या अहवालाशी केली. अशा रितीने राज्यातील सरासरी पारेषण हानि निश्चित करण्यासाठी स्वीकारार्ह असा आधार उपलब्ध झाला.

### वितरण मुक्त प्रवेश

राज्यातील वीज क्षेत्रात मुक्त प्रवेश यशस्वी करण्यासाठी, राज्य पारेषण कंपनी, वीज वितरण कंपन्या आणि भार प्रेषण विभाग हे एकत्रितरित्या महत्वाची भूमिका पार पाडतात. राज्यातील मुक्त प्रवेशाच्या सद्यस्थितीचे संनियंत्रण करण्यासाठी संनियंत्रण कक्षाने यंत्रणा उभारली आणि फोरम ऑफ इंडियन रेग्युलेटर्स (एफओआयआर)ला मासिक माहिती उपलब्ध करण्यासाठी एक संनियत्रण व समन्वय व्यासपीठ स्थापन केले.

### उसाच्या चिपाड्यांवर आधारित वीज निर्मिती प्रकल्प

राज्यातील उसाच्या चिपाड्यांवर आधारित औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पांचे ठरावीक काळाने लेखापरीक्षण करण्यासाठी आयोगाने मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. आयोगाच्या निर्देशांचे पालन होत असल्याची खात्री करण्यासाठी काही वीज निर्मिती केंद्रांनी सादर केलेल्या अहवालांची अनुपालन संनियंत्रण कक्षाने छाननी केली.

## ग्राहक आधार कक्ष

विद्युत अधिनियम, २००३ च्या प्रस्तावनेत विशद केलेल्या उद्देशांत, इतर उद्देशांबरोबर, ग्राहकांच्या हिताचे रक्षण करणे, हा देखील एक उद्देश आहे. या उद्देशांची अंमलबजावणी करण्यासाठी आयोगाने, संचालक (विद्युत अभियांत्रिकी) यांच्या देखरेखीखाली 'ग्राहक आधार कक्षा' ची स्थापना फेब्रुवारी २००८ मध्ये केली. या कक्षाकडून ग्राहक जागरुकता, प्रसिध्दी माध्यमांशी संपर्क, जन संपर्क, ग्राहक गाऱ्हाणी, ग्राहक गा-हणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल (इलेक्ट्रिसिटी ओम्बड्समन) इ. बाबी हाताळण्यात येतात.

ग्राहक आधार कक्षाच्या कार्याची दिशा ठरविण्यासाठी अधिकृत ग्राहक प्रतिनिधींच्या समवेत दिनांक २५ फेब्रुवारी, २००८ रोजी कक्षाची पहिली बैठक झाली. या बैठकीत मान्यवर सदस्यांनी केलेल्या सूचनांच्या आधारे चालू वर्षासाठी एक कृती-कार्यक्रम कक्षाने तयार केला. त्यानुसार, ग्राहक प्रतिनिधींच्या सहाय्याने ग्राहकांच्या प्रबोधनासाठी जाहिरात व अन्य कामाकरिता एक माहिती-पत्रक तयार करण्यात आले. याचा उपयोग अनेक कार्यशाळांसाठी करण्यात आला. दोन कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या, त्यापैकी पहिली कार्यशाळा, मुंबई ग्राहक पंचायतीने मुंबई येथे दिनांक १२ मार्च, २००८ रोजी आयोजित केली होती तर दुसरी, महाराष्ट्र राज्य वीज ग्राहक संघटनेने महाराष्ट्रात इचलकरंजी येथे दिनांक २० एप्रिल, २००८ रोजी आयोजित केली. मुंबई येथील कार्यशाळेत संचालक (विद्युत अभियांत्रिकी) यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. ग्राहकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करुन देण्यासाठी, आकाशवाणीवरील 'दिलखुलास' या कार्यक्रमात दिनांक २७ फेब्रुवारी, २००८ रोजी मा. विद्युत लोकपाल श्री. डब्ल्यु. जी. गोर्डे यांच्याबरोबर एक मुलाखत आयोजित करण्यात आली होती.

आयोगाने, यापूर्वीच सर्व ग्राहकांकरिता एक ग्राहक हक्क विवरणपत्र तयार केले होते. या संदर्भात, सर्व परवानेधारकांना निर्देश देण्यात आले की, विद्यमान ग्राहकांनी विनंती केल्यास त्यांना विनामूल्य आणि नवीन ग्राहकांना वीज जोडणी देण्याच्या वेळी हे विवरणपत्र उपलब्ध करुन द्यावे तसेच ते वेब-साईटवर प्रदर्शित करावे. आयोगाने असे मत व्यक्त केले की, परवानेधारकांनी ग्राहक प्रबोधन करण्यावर अधिक भर देणे आवश्यक होते कारण ग्राहकांची सध्याची संख्या मोठी असून त्यात सातत्याने भर पडत आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकाच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ मधील विनियम ८.१५.४ (क)चे परंतुक विचारात घेऊन आयोगाने ग्राहक हक्क विवरणपत्र उपलब्ध असल्याबाबत वर्तमानपत्रांद्वारे व्यापक प्रसिध्दी देण्याचे निर्देश सर्व विद्युत कंपन्यांना दिले आहेत.

ग्राहकांच्या गाऱ्हाण्याचे निवारण करण्यासाठीची यंत्रणा, ग्राहकांचे हक्क, ग्राहकांकरिता अन्य वेब-साईटची उपलब्धता, विजेची बचत व सुरक्षिततेबाबतच्या सूचना, अशा अनेक नवीन विषयांची भर घालून आयोगाची वेब-साईट अद्ययावत व अधिकाधिक ग्राहकाभिमुख करण्यात येत आहे.

## विद्युत लोकपाल (इलेक्ट्रिसिटी ओम्बड्समन)

विद्युत लोकपालाचे कार्यालय दिनांक २७ डिसेंबर, २००४ रोजी सुरु करण्यात आले. ग्राहक गाऱ्हाणे मंचांकडून गाऱ्हाण्याचे निवारण न झालेल्या ग्राहकांची निवेदने, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ४२(६) च्या आधारे, स्वीकारण्यास या कार्यालयाने लगेच सुरुवात केली.

जानेवारी, २००५ ते मार्च, २००५ या सुरुवातीच्या ३ महिन्यांच्या कालावधीत, कार्यालयास ५ निवेदने प्राप्त झाली. त्यानंतर, या निवेदनांचा ओघ वाढू लागला. सन २००५-०६ मध्ये निवेदनांची संख्या ५८ पर्यंत वाढली. या संदर्भात, अधिक जनजागृती झाल्यामुळे, निवेदनांच्या संख्येतही मोठ्या प्रमाणात वाढ होऊन सन २००६-०७ मध्ये एकूण ८४ निवेदने प्राप्त झाली.

अहवाल सालात, ८२ निवेदने प्राप्त झाली. त्यापैकी ६८ निवेदनांवर निकाल देण्यात आला. मागील वर्षात प्राप्त झालेल्या ६ निवेदनांवर देखील अहवाल सालात निकाल देण्यात आला. अशा रितीने एकूण, ७४ निवेदने निकाली काढण्यात येऊन त्यासंबंधी आदेश देखील सन २००७-०८ मध्ये पारित करण्यात आले. ग्राहकांच्या गाऱ्हाण्याचे निवारण करण्यासाठी विनियमांमध्ये ६० दिवसांचा कालावधी ठरविण्यात आला आहे. तरीही एक निवेदन प्रत्यक्षात सरासरी ३६ दिवसात निकाली काढण्यात आले. त्यामुळे अधिनियमाखाली अभिप्रेत असल्याप्रमाणे, ग्राहकांच्या गाऱ्हाण्यांचे निवारण करण्यासाठी ही एक कमी खर्चाची व कार्यक्षम यंत्रणा असल्याचे सिध्द झाले आहे.

- विद्युत लोकपालाकडे प्राप्त झालेल्या आणि त्यांनी निकाली काढलेल्या निवेदनांचे विश्लेषण करता, बरीच गाऱ्हाणी ही विद्युत देयकांबाबतचे वाद, दंड आकारणी, देयकातील परिगणनेच्या चुका, बंद/सदोष मीटरच्या काळातील देयके, मीटरमधील चुकीच्या नोंदी, जागेच्या पूर्वीच्या मालकाच्या थकबाकीची वसूली इ. बाबतची असल्याचे, दिसून आले. काही वेळा, नवीन वीज जोडणी देण्यात होणारा विलंब, नवीन जोडणी देताना जादा रकमांची वसूली, विजेच्या पुरवठ्यात व्यत्यय, योग्य नोटीस न देता वीज पुरवठा खंडित करणे/तोडणे, इ. मुद्दे देखील काही ग्राहकांनी उपस्थित केले होते.
- अनेक निवेदनांमध्ये, ग्राहकांनी वीज पुरवठ्याबाबतच्या सेवेतील उणीवांबाबत तक्रारी केल्या होत्या आणि विविध कारणांसाठी भरपाईची मागणी केली होती. अशी निवेदने देखील निकाली काढण्यात येऊन, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानेधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २००५ नुसार सेवेतील उणीवांबाबत भरपाईदेखील मंजूर करण्यात आली होती.
- विद्युत अधिनियमांतर्गत विद्युत लोकपालाच्या नियुक्तीमुळे, अधिनियमात अभिप्रेत असल्याप्रमाणे, ग्राहकांना गाऱ्हाण्याचे निवारण करण्यासाठी गतिमान, सुलभ व स्वस्त परंतु कार्यक्षम पर्यायी व्यवस्था खरोखरच उपलब्ध झाली आहे.

## परिशिष्ट-१

### सन २००७ - २००८ मध्ये आयोगासमोर दाखल झालेल्या याचिका

| अ. क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.(महावितरण कंपनी) | टाटा पॉवर कंपनी लि.(टीपीसी) | ०३.०४.२००७ | २००७ चा १ | टीपीसीला ज्यादा वीज खेचण्यापासून प्रतिबंध करण्यासाठी निर्देश मिळण्यासाठी याचिका |
| २ | आयोग स्वत: | महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि. (महानिर्मिती कंपनी) | ०४.०४.२००७ | २००७ चा २ | अस्तित्वात असलेले वीज दर लागू करण्याची मुदत वाढविण्याबाबत |
| | आयोग स्वत: | रिलायन्स एनर्जी लि.(आरईएल) | ०२.०४.२००७ | | |
| | आयोग स्वत: | टीपीसी | ०९.०४.२००७ | | |
| | आयोग स्वत: | महावितरण कंपनी लि. | ०४.०४.२००७ | | |
| ३ | आयोग स्वत: | आरईएल | ०४.०४.२००७ | २००७ चा ३ | विद्युत अपील न्यायाधिकरणाने अपील क्र. २००६/२५१ मध्ये दिनांक ४ एप्रिल, २००७ रोजी दिलेल्या निकालाची अंमलबजावणी करणेबाबत |
| ४ | रिलायन्स एनर्जी लि. | लागू नाही | २९.०३.२००७ | २००७ चा ४ | प्रकरण क्र. २००६/६ मधील दिनांक १६.०८.२००६ चा आदेश (आरपीओ यंत्रणा) |
| ५ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | लागू नाही | १२.०४.२००७ | २००७ चा ५ | महाराष्ट्र राज्यात भार नियमनाची तत्त्वे व कार्यपध्दती यांचे पुनर्विलोकन करण्यासाठी याचिका |
| ६ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | लागू नाही | २६.०१.२००७ | २००७ चा ६ | कृषी योजनांकरिता भार नियमन/भार व्यवस्थापनाची तत्त्वे व कार्यपध्दती सुरु करण्याबाबत याचिका |
| ७ | श्री आर, सी. साखरे | का.अभि. (नागपूर शहर मंडल) मुख्य अभि. (नागपूर अर्बन झोन) व महावितरण कंपनी | १७.०४.२००७ | २००७ चा ७ | विद्युत लोकपाल यांच्या दिनांक २५-०८-२००६ च्या आदेशाचे पालन न केल्याबाबत दंडात्मक कारवाईच्या मागणीसाठी अर्ज |
| ८ | श्री. आर. के. चौधरी, | महावितरण कंपनी | ०७.०५.२००७ | २००७ चा ८ | नियोजित भार नियमनाचे तास वगळून कृषी पपांना अखंडीत वीज पुरवठा व्हावा यासाठी अर्ज |
| ९ | ठाणे बेलापूर इंडस्ट्रिज असोसिएशन (टीबीआयए) | महावितरण कंपनी | १९.०४.२००७ | २००७ चा ९ | नवी मुंबईच्या एमआयडीसी क्षेत्रात महावितरण कंपनीने भार नियमन न करण्याबाबत आणि दुसरी सक्तीची सुट्टी न लादण्यासाठी याचिका |
| १० | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | मुळा प्रवरा विद्युत सहकारी सो. लि. (मुळा प्रवरा सोसायटी) आणि महाराष्ट्र शासन | २५.०५.२००७ | २००७ चा १० | परवाना रद्द /निलंबित करण्यासाठी चौकशी सुरु करण्याकरिता अर्ज |
| ११ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | बेस्ट, आरईएल आणि टीपीसी | २९.०५.२००७ | २००७ चा ११ | टीपीसीने दिनांक २९-९-२००६ च्या आदेशाच्या स्पष्टीकरणासाठी केलेल्या प्रकरण २००६/७६ मधील दिनांक १५-५-२००७ रोजीच्या आदेशाचे पुनर्विलोकन करण्यासाठी याचिका |
| १२ | असोसिएटेड कॅप्सुल्स प्रा.लि | आरईएल | ०७.०६.२००७ | २००७ चा १२ | आरईएल (वितरण व्यवसाय)च्या आर्थिक वर्ष २००७-०८ ते २००९-१० करिता एआरआर आणि आर्थिक वर्ष २००७-०८ करिता किरकोळ वीज विक्रीकरिता दिनांक २४-०४-२००७ च्या आदेशाने दिलेल्या मंजूरीचे पुनर्विलोकन |
| १३ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | महापारेषण कंपनी, टीपीसी, आरईएल, बेस्ट | ०६.०६.२००७ | २००७ चा १३ | पारेषण सेवा आकारांचे प्रदान टप्प्याटप्प्याने करण्याच्या पध्दतीस परवानगी देण्यासाठी याचिका |
| १४ | मुळा प्रवरा विद्युत सहकारी सो. लि. | लागू नाही | १४.०५.२००७ | २००७ चा १४ | मुळा प्रवरा विद्युत सहकारी सो. ला लागू होणा-या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकाच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करण्याचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २००५ मध्ये अधिसूचित केलेल्यांपैकी काही कृतीची मानके शिथील करण्याच्या मागणीसाठी याचिका |
| १५ | श्री. दिगंबर एच. खापरे | का. अभि. आणि नोडल अधिकारी, का.अभि. (सं.व सु), ग्रामीण, आणि सहा. अभि. (सं.व सु.), उप-विभाग, सांगली | २१.०५.२००७ | २००७ चा १५ | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कोल्हापूर, यांनी दिनांक ९-२-२००७ रोजी पारित केलेल्या आदेशाचे पालन न झाल्याबाबत |

| अ. क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| १६ | आयोग स्वत: | महावितरण कंपनी, महापारेषण कंपनी, महानिर्मिती कंपनी, टीपीसी, आरईएल, बेस्ट आणि मुळा प्रवरा सोसायटी | २६.०२.२००७ | २००७ चा १६ | २५ फेब्रुवारी २००७ रोजी ग्रीडमधील व्यत्यय आणि वीज पुरवठा मोठ्या प्रमाणात खंडीत झाल्याबाबत |
| १७ | महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि. | लागू नाही | २५.०५.२००७ | २००७ चा १७ | महानिर्मिती कंपनी देखभाल करीत असलेल्या जल-निर्मिती विद्युत केंद्रांच्या भाड्याच्या मान्यतेसाठी याचिका |
| १८ | बालाजी इलेक्ट्रो स्मेल्टर्स लि. | महावितरण कंपनी | ११.०६.२००७ | २००७ चा १८ | उच्च दाब अखंडीत व खंडीत उद्योगांकरिता अतिरिक्त वीज पुरवठ्याच्या आकारणी आणि विद्युत भार नियंत्रणाच्या लोड फॅक्टर फॉर्म्युला इन्सेंटिव्हजबाबत स्पष्टीकरण |
| १९ | महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा) | महावितरण कंपनी, टीपीसी, मुळा प्रवरा सोसायटी आरईएल, बेस्ट | २२.०५.२००७ | २००७ चा १९ | आयोगाच्या दिनांक ३-९-२००४ च्या आरपीओ आदेशाचे आर्थिक वर्ष २००४-०५ आणि २००५-०६ मध्ये वितरण परवानाधारकांनी पालन न केल्याबाबत आदेश देण्यासंबंधी |
| २० | सिग्नुन रिॲलिटीज | महावितरण कंपनी | २५.०६.२००७ | २००७ चा २० | विरार येथील प्रस्तावित सिग्नुन किंगडम नगरीच्या मर्यादित हद्दीत विजेच्या वहन आणि बॅंकिंगवर आधारित वितरण फ्रॅन्चायसीला मान्यता मिळणेबाबत |
| २१ | बजाज ऑटो लि. | महावितरण कंपनी | २५.०६.२००७ | २००७ चा २१ | सर्व पवन उर्जेचा स्वत:साठी वापर करणारे/अन्य विक्रेते, गट-२ योजना (२७ डिसेंबर, १९९९ नंतर परंतु १ एप्रिल, २००३ पूर्वी सुरु झालेल्या) ज्यांनी, वीज दराच्या दिनांक २४-११-२००३ च्या आदेशानुसार, पवन उर्जा क्रेडीट, वहन आकार, पारेषण हानि, रिॲक्टिव्ह पॉवर आकार, बॅंन्किंग इ. बाबतीत ८ आर्थिक वर्षे पूर्ण केली आहेत, त्यांच्या संदर्भात सद्य-स्थिती कायम रहावी म्हणून महावितरण कंपनीला निर्देश देण्यासाठी आदेश होण्याबाबत |
| २२ | श्री. व्ही. एन. जगताप | अध्यक्ष (अंतर्गत ग्राहक गा-हाणे निवारण कक्ष), सांगली, कार्यकारी अभियंता आणि नोडल अधिकारी, महावितरण कंपनी,(सं.व सु.), सांगली | ०४.०७.२००७ | २००७ चा २२ | प्रकरण क्रमांक २००५/७० मधील आयोगाच्या दिनांक ०८-०९-२००६ च्या आदेशाचा अवमान झाल्याबाबत (महावितरण कंपनीची आकारांची अनुसूची) |
| २३ | एम्पायर इंडस्ट्रिज लि. | टीपीसी | २९.०६.२००७ | २००७ चा २३ | आर्थिक वर्ष २००७-०८ ते २००९-१० च्या नियंत्रण कालावधीकरिता टीपीसीच्या बहु वर्षीय वीज दराच्या आयोगाने पारित केलेल्या दिनांक ३०-०४-२००७ च्या आदेशाचे पुनर्विलोकन |
| २४ | महाराष्ट्र राज्य वीज ग्राहक संघटना | महावितरण कंपनी | २७.०६.२००७ | २००७ चा २४ | अंदाजित खर्चासाठी एक रकमी आकारलेली रक्कम (ओआरसी), मीटरची किंमत इ. करिता वसूल केलेली रक्कम परत करण्याबाबतच्या प्रकरण क्र. २००६/८२ मधील आयोगाने दिनांक १७-०५-२००७ रोजी पारित केलेल्या आदेशाचे पुनर्विलोकन |
| २५ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | लागू नाही | ०५.०७.२००७ | २००७ चा २५ | खुल्या वर्गातील मृत कर्मचा-यांवर अवलंबून असणा-यांमधून वेतन गट ३ व ४ मधील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत |
| २६ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | लागू नाही | ०२.०७.२००७ | २००७ चा २६ | बेरजेच्या व टंकलेखनातील चुकांमुळे महसुलाची वसूली करण्यास मंजूरी न दिलेल्या मा. आयोगाच्या दिनांक १८ मे, २००७ च्या सविस्तर आदेशाबाबत स्पष्टीकरणासाठी याचिका |
| २७ | युरोटेक्स इंडस्ट्रिज ॲन्ड एक्सपोर्ट्स लि. | महावितरण कंपनी | २८.०६.२००७ | २००७ चा २७ | आयोगाच्या दिनांक २१ मे, २००४ च्या आदेशाचे उल्लंघन केल्याबाबत विद्युत अधिनियमाच्या कलम १४२ सह कलम १४६ खाली तक्रार |
| २८ | युरोटेक्स इंडस्ट्रिज ॲन्ड एक्सपोर्ट्स लि. | महावितरण कंपनी | २२.०६.२००७ | २००७ चा २८ | महावितरण कंपनीच्या आर्थिक वर्ष २००७-०८ ते २००९-१० या नियंत्रण कालावधीतील एआरआर आणि आर्थिक वर्ष २००७-०८ चा वीज दर ठरविणा-या आदेशचे पुनर्विलोकन |
| २९ | टाटा पॉवर कंपनी लि. | लागू नाही | ०६.०७.२००७ | २००७ चा २९ | टीपीसी (वितरण)ने विविध स्त्रोतांकडून एप्रिल, मे व जून, २००७ या महिन्यांकरिता अल्पकालीन वीज खरेदी करणे आणि मविनिआ (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ मधील अनुक्रमे विनियम २५ आणि विनियम ८४ व ८५ नुसार तिमाहीकरिता वीज प्राप्त करून घेण्याकरिता पूर्व-मान्यता घेण्याबाबतची अडचण दूर करणे |
| ३० | रिलायन्स एनर्जी लि. | टीपीसी, बेस्ट | ११.०७.२००७ | २००७ चा ३० | आरईएल, टीपीसी व बेस्ट यांनी करावयाच्या वीज खरेदी करारातील ऊर्जा/विजेचे परिमाण निश्चित करणे |

| अ. क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| ३१ | टाटा पॉवर कंपनी लि. | लागू नाही | १०.०७.२००७ | २००७ चा ३१ | टीपीसीला नूतनशील वीज खरेदीचे बंधन पाळण्याकरिता त्यांच्या सुपा पवन योजनेतून निर्माण झालेल्या विजेला १०० टक्के क्रेडीट मंजूर करणे आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाज प्रचालन) विनियम, २००४ मधील विनियम ८५ नुसार सध्या करण्यात येत असलेल्या मासिक 'नेटींग' च्या ऐवजी १५ मिनिटांच्या तत्त्वावर 'नेटींग' करता येईल अशा एबीटी पध्दतीखाली विजेचा हिशोब करण्याकरिता वाजवी यंत्रणेस मान्यता देणे |
| ३२ | आयोग स्वत: | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | १८.०७.२००७ | २००७ चा ३२ | आपल्या परवाना क्षेत्रात क्षेत्रीय भेटी सुकर व्हाव्यात याकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने समन्वय अधिकारी नामनिर्देशीत करण्याबाबत |
| ३३ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | रीडॅम आणि इंडिया विंड एनर्जी असोसिएशन | २०.०७.२००७ | २००७ चा ३३ | वैधता कालावधी संपल्यानंतर गट-दोन वर्गवारीतील पवन उर्जा प्रकल्पातील पवन उर्जा खरेदीसाठी आणि/किंवा उर्जेच्या वहनाकरिता वीज दर, मुदत आणि इतर वाणिज्यिक अटी व शर्ती याकरिता निर्देश किंवा आदेश होण्याकरिता याचिका |
| ३४ | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. | लागू नाही | २४.०७.२००७ | २००७ चा ३४ | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ मधील विनियम ४५ व ८५ खाली विजेचे वहन करणे शक्य व्हावे, याकरिता महापारेषण कंपनीला पायाभूत सुविधांचा विकास करण्यास तत्त्वत: मान्यता देणे |
| ३५ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | लागू नाही | २५.०७.२००७ | २००७ चा ३५ | आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बोलीच्या प्रक्रियेखाली (उदाहरण-दोन) धोपावे प्रकल्पाच्या विकासाकरिता, विद्युत मंत्रालयाने उदाहरण-दोन खाली स्पर्धात्मक बोलीच्या प्रक्रियेकरिता निर्गमीत केलेल्या प्रमाण बोली दस्तावेजांपासून विनंती अर्जात घेण्यात आलेल्या तफावतींना, मान्यता देण्याकरिता याचिका |
| ३६ | येर्ते बसवराज गुरुपादप्पा | श्री. वाणे, मु.अभियंता, (लातुर झोन), श्री. रतनराज गीर,अधिक्षक अभियंता, श्री.कवठेकर,कार्यकारी अभियंता, लातूर विभाग | २४.०७.२००७ | २००७ चा ३६ | अंदाजित खर्चासाठी एक रकमी आकारलेली रक्कम (ओआरसी) व सर्व्हीस लाईन चार्जेस (एसएलसी) बाबतच्या ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाच्या, आयोगाच्या आदेशांची अंमलबजावणी न करणे आणि मविनिआ (वितरण परवानेधारकाच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २००५ चा भंग |
| ३७ | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. | लागू नाही | ३१.०७.२००७ | २००७ चा ३७ | औद्योगिक अभियांत्रिकी अभ्यासावर आधारित कर्मचा-यांच्या आकृतीबंधास मंजूरी देण्याकरिता आणि आयोगाच्या सन १९९९ च्या प्रकरण क्र. १ मधील दिनांक ५ मे, २००० च्या आदेशानुसार वेतन-गट ३ व ४ वर्गवारीतील कर्मचा-यांच्या भरतीवरील बंदी उठविण्यासाठी याचिका |
| ३८ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | लागू नाही | ०६.०७.२००७ | २००७ चा ३८ | उदाहरण-१ बोलीखाली दीर्घकालीन वीज प्राप्तीकरिता सुधारित बोली दस्तावेजांना मान्यता |
| ३९ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | महानिर्मिती कंपनी | ३१.०७.२००७ | २००७ चा ३९ | महावितरण कंपनी आणि महानिर्मिती कंपनी यांच्यातील वीज खरेदी करारास मान्यता |
| ४० | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | लॅन्को एनर्जी प्रा. लि. | २५.०७.२००७ | २००७ चा ४० | महावितरण कंपनीने लॅन्को एनर्जी प्रा. लि.शी केलेल्या वीज खरेदी करारास मान्यता दिलेल्या मा. आयोगाच्या दिनांक २६-०६-२००७ च्या आदेशाचे पुनर्विलोकन |
| ४१ | आयोग स्वत: | महावितरण कंपनी | १७.०८.२००७ | २००७ चा ४१ | महावितरण कंपनीने वीज मागणीच्या व्यवस्थापनासाठी घेतलेल्या पुढाकाराबाबत आयोगाने स्वत: सुरु केलेली सुनावणी |
| ४२ | हमिल इरा टेक्स्टाईल्स लि. | महावितरण कंपनी | १३.०८.२००७ | २००७ चा ४२ | प्रतिवादीने दिनांक २२-०६-२००७ व २१-०७-२००७ ची पाठविलेली बेकायदेशीर देयके |
| ४३ | पुणे महानगरपालिका | महावितरण कंपनी | १३.०४.२००७ | २००७ चा ४३ | पुणे महानगर पालिकेच्या पाणी पुरवठा विभागास रिलायेबिलिटी आकार व अतिरिक्त वीज पुरवठा आकार लावण्यातून सूट मिळणेबाबत |
| ४४ | रिलायन्स एनर्जी लि. | लागू नाही | १७.०८.२००७ | २००७ चा ४४ | आरईएल-वितरण व्यवसायाने विविध स्रोतांकडून एप्रिल, मे व जून, २००७ करिता अल्प-कालिन वीज खरेदी करणे आणि मविनिआ (वीज दराच्या अटी व शर्ती ) विनियम, २००५ मधील अनुक्रमे विनियम २५ आणि विनियम ८४ व ८५ नुसार तिमाहीकरिता वीज प्राप्त करुन घेण्याकरिता पूर्व-मान्यता घेण्याबाबतची अडचण दूर करणे |
| ४५ | लॉईड्स स्टील इंडस्ट्रीज लि. | महावितरण कंपनी | २९.०८.२००७ | २००७ चा ४५ | ग्राहकांना वाढीव अतिरिक्त वीज पुरवठा आकार लावण्याबाबत स्पष्टीकरण देण्याबाबत |

| अ. क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| ४६ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | लागू नाही | २९.०८.२००७ | २००७ चा ४६ | महावितरण कंपनीच्या वीज प्राप्ती/क्षमता वाढीच्या योजनेसह उदाहरण-१ व उदाहरण-२ च्या माध्यमातून स्पर्धात्मक बोलीच्या मार्गाद्वारे महावितरण कंपनीने करावयाच्या अतिरिक्त दीर्घ-कालीन वीज खरेदीस मान्यता<br>उदाहरण-१ मधील वीज प्राप्ती प्रक्रियेनुसार सध्या करण्यात येत असलेल्या वीज खरेदीचे प्रमाण वाढविण्यास मान्यता<br>स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारा महावितरण कंपनीने करावयाच्या दीर्घकालीन वीज खरेदीच्या बोली प्रक्रियेतीकरिता सुधारित वेळा-पत्रकास मान्यता |
| ४७ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | लागू नाही | २४.०९.२००७ | २००७ चा ४७ | दिनांक २४-०८-२००७ सह दिनांक १८-०५-२००७ च्या आदेशांच्या, त्यातील आरएलसी आकारांशी संबंधित भागाच्या, पुनर्विलोकनासाठी याचिका |
| ४८ | श्री. विनायक एस. मोरे | श्री. एस. वहाणे, का.अ. महावितरण कंपनी, भांडुप | २४.०७.२००७ | २००७ चा ४८ | प्रस्थापित हितसंबंधांमुळे पदाचा गैरवापर करुन प्रतिवादीने विद्युत पुरवठा संहितेचा मुद्दाम केलेला भंग आणि त्यामुळे महावितरण कंपनीला झालेला तोटा |
| ४९ | नवी मुंबई इस्पात उद्योग | महावितरण कंपनी | ०४.१०.२००७ | २००७ चा ४९ | महावितरण कंपनीच्या आर्थिक वर्ष २००४-०५, २००५-०६ आणि २००६-०७ च्या वार्षिक महसूली गरज आणि आर्थिक वर्ष २००६-०७ करिता वीज दराचे निश्चितीकरण करणा-या दिनांक २०-१०-२००६ च्या आदेशासह दिनांक २६-०२-२००७ च्या स्पष्टीकरणात्मक आदेशाचे पुनर्विलोकन |
| ५० | ग्लोबल बोर्डस लि. | महावितरण कंपनी | १५.१०.२००७ | २००७ चा ५० | आर्थिक वर्ष २००७-०८ ते २००९-१० च्या नियंत्रण कालावधीकरिता महावितरण कंपनीची वार्षिक महसूली गरज आणि आर्थिक वर्ष २००७-०८ करिता वीज दराबाबतच्या प्रकरण क्र. २००७/२६ आणि प्रकरण क्र. २००६/६५ मध्ये आयोगाने पारित केलेल्या दिनांक ११-०९-२००७ च्या आदेशाचे स्पष्टीकरण |
| ५१ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | लागू नाही | २०.१०.२००७ | २००७ चा ५१ | पुणे शहरातील भार नियमन शिथील करण्यासाठी अतिरिक्त खर्चाची रिलायेबिलिटी आकार म्हणून वसुली करण्याबाबत |
| ५२ | टाटा पॉवर कंपनी लि. | लागू नाही | १६.१०.२००७ | २००७ चा ५२ | खर्चिक विजेवरील एफ ए सी वगळण्यास मान्यता मिळणे |
| ५३ | सनफ्लॅग आयर्न ॲन्ड स्टील कंपनी लि. | महावितरण कंपनी | १२.०९.२००७ | २००७ चा ५३ | जास्त मागणी नसल्याच्या काळात याचिकाकारास स्व-वापरासाठीच्या विजेकरिता बॅन्किंग सुविधा पुरविणेबाबत |
| ५४ | पुर्ती साखर कारखाना लि. | टीपीसी, आरईएल, आरईएल-व्यापार, महापारेषण कंपनी | १७.०९.२००७ | २००७ चा ५४ | पारेषण मुक्त प्रवेश, देयके तयार करण्याची प्रक्रिया याबतचे वाद निश्चित करणे व अन्य उचित निर्देश देणेबाबत |
| ५५ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | लागू नाही | २९.१०.२००७ | २००७ चा ५५ | जास्त विद्युत भार असणा-या एमआयडीसीमधील केंद्रांकरिता भार नियमन कमी करण्यासाठी अल्प कालावधीत वीज निर्मिती करु शकणा-या वीज निर्मिती केंद्रांकडून वीज प्राप्त करुन घेण्यास तत्वत: मंजूरी देणेबाबत |
| ५६ | महाराष्ट्र राज्य वीज ग्राहक संघटना | महावितरण कंपनी | ०२.११.२००७ | २००७ चा ५६ | मीटरची किंमत परत करण्याबाबत महावितरण कंपनीने निर्गमित केलेल्या दिनांक ३ सप्टेंबर, २००७ रोजीच्या निर्देशातील सुधारणा/दुरुस्ती आणि आयोगाने प्रकरण क्र.२००५/७० मध्ये दिनांक ८ सप्टेंबर, २००६ रोजी निर्गमित केलेल्या आदेशाविरुध्द वसूल केलेले ओआरसी आकार आणि अशा अन्य शीर्षकाखाली वसूल केलेले आकार, आयोगाने प्रकरण क्र. २००६/८२ मध्ये दिलेल्या दिनांक १७ मे २००७ आदेशानुसार, परत करण्याची मागणी |
| ५७ | चेंबर ऑफ मराठवाडा असोसिएशन ॲन्ड ॲग्रिकल्चर | महावितरण कंपनी | ०१.११.२००७ | २००७ चा ५७ | महावितरण कंपनीने आरएलसी परत करणे आणि आरएलसी परत करण्यास मा. आयोगाने दिलेल्या निर्देशांचा भंग आणि विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १४२ खाली कारवाई सुरु करण्याबाबत |
| ५८ | शहाबुद्दीन आमीन मगदुम | कार्यकारी अभियंता (ओ) आणि नोडल अधिकारी, महावितरण कंपनी, सं.व सु. मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली | ०५.११.२००७ | २००७ चा ५८ | महावितरण कंपनी, सांगली, यांच्याकडून विद्युत अधिनियम, २००३ च्या विनियमातील तरतुदींचा भंग |
| ५९ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | मेसर्स पूर्ती साखर कारखाना आणि राज्य भार प्रेषण केंद्र | ०५.११.२००७ | २००७ चा ५९ | तत्कालिन मराविमं आणि मेसर्स पूर्ती साखर कारखाना यांच्यातील दिनांक २ सप्टेंबर, २००२ चा ऊर्जा खरेदी करार |
| ६० | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | लागू नाही | १९.११.२००७ | २००७ चा ६० | महाराष्ट्रातील उद्योगांकरिता दुसरी सक्तीची सुट्टी टाळण्यासाठी व इतर क्षेत्रातील भार नियमन कमी करण्याकरिता याचिका |

| अ. क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| ६१ | श्री.अनिल मुरलीधर वाडपल्लीवार | महावितरण कंपनी | १५.११.२००७ | २००७ चा ६१ | महाराष्ट्रातील उद्योगांकरिता दुसरी सक्तीची सुट्टी टाळण्यासाठी व इतर क्षेत्रातील भार नियमन कमी करण्याकरिता याचिका |
| ६२ | बेस्ट उपक्रम | लागू नाही | ०७.११.२००७ | २००७ चा ६२ | बेस्ट-वितरण व्यवसायाने विविध स्रोतांकडून एप्रिल, मे व जून, २००७ करिता अल्प-कालीन वीज खरेदी करणे आणि मविनिआ (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ मधील अनुक्रमे विनियम २५ आणि विनियम ८४ व ८५ नुसार तिमाहीकरिता वीज प्राप्त करुन घेण्याकरिता पूर्व-मान्यता घेण्याबाबतची अडचण दूर करणे |
| ६३ | महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (मेडा) | लागू नाही | १९.११.२००७ | २००७ चा ६३ | गुंतवणूकदार आणि विद्युत परवानाधारक कंपनी यांच्यात क्लिन डेव्हलपमेंट मेकॅनिझमचे (सीडीएम) लाभ विभागून घेण्यासाठी पध्दत ठरविण्याकरिता याचिका |
| ६४ | रिलायन्स एनर्जी लि. पारेषण व्यवसाय | लागू नाही | २९.११.२००७ | २००७ चा ६४ | बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीखाली वार्षिक कामगिरीच्या आढाव्यास मान्यतेसाठी आरईएल-पारेषणची याचिका- आर्थिक वर्ष २००७ च्या एआरआर समायोजनेसाठी, आर्थिक वर्ष २००८ च्या एआरआरच्या सहामाही आढाव्यासाठी आणि आर्थिक वर्ष २००९ च्या वीज दर निश्चितीसाठी एआरआरचे सुधारित अंदाज |
| ६५ | रिलायन्स एनर्जी लि. निर्मिती व्यवसाय | लागू नही | २९.११.२००७ | २००७ चा ६५ | बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीखाली वार्षिक कामगिरीच्या आढाव्याच्या मान्यतेसाठी आरईएल-निर्मितीची याचिका- आर्थिक वर्ष २००७ च्या एआरआर समायोजनेसाठी, आर्थिक वर्ष २००८ च्या एआरआरच्या सहामाही आढाव्यासाठी आणि आर्थिक वर्ष २००९ च्या वीज दर निश्चितीकरिता एआरआरचे सुधारित अंदाज |
| ६६ | रिलायन्स एनर्जी लि. वितरण व्यवसाय | लागू नाही | ०३.१२.२००७ | २००७ चा ६६ | बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीखाली वार्षिक कामगिरीच्या आढाव्याच्या मान्यतेसाठी आरईएल-वितरणची याचिका- आर्थिक वर्ष २००७ च्या एआरआर समायोजनेसाठी, आर्थिक वर्ष २००८ च्या एआरआरच्या सहामाही आढाव्यासाठी आणि आर्थिक वर्ष २००९ च्या वीज दराच्या निश्चितीकरणासाठी एआरआरचे सुधारित अंदाज |
| ६७ | टाटा पॉवर कंपनी लि. पारेषण व्यवसाय | लागू नाही | २९.११.२००७ | २००७ चा ६७ | बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीखाली सन २००८-०९ (आर्थिक वर्ष २००९) करिता पारेषण व्यवसायाच्या वार्षिक कामगिरीच्या आढाव्याच्या मान्यतेसाठी टीपीसीचा प्रस्ताव |
| ६८ | टाटा पॉवर कंपनी लि. निर्मिती व्यवसाय | लागू नाही | २९.११.२००७ | २००७ चा ६८ | बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीखाली सन २००८-०९ (आर्थिक वर्ष २००९) करिता निर्मिती व्यवसायाच्या वार्षिक कामगिरीच्या आढाव्यास मान्यतेसाठी टीपीसीचा प्रस्ताव |
| ६९ | टाटा पॉवर कंपनी लि. वितरण व्यवसाय | लागू नाही | २९.११.२००७ | २००७ चा ६९ | बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीखाली सन २००८-०९ (आर्थिक वर्ष २००९) करिता वितरण व्यवसायाच्या वार्षिक कामगिरीच्या आढाव्यास मान्यतेसाठी टीपीसीचा प्रस्ताव |
| ७० | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. | लागू नाही | ३०.११.२००७ | २००७ चा ७० | बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीखाली महापारेषण कंपनीच्या दिनांक ०१-०४-२००७ ते ३१-०३-२०१० च्या पहिल्या नियंत्रण कालावधीतील आर्थिक वर्ष २००७-०८ या पहिल्या वर्षाच्या वार्षिक कामगिरीचा आढावा |
| ७१ | महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि. | लागू नाही | ३०.११.२००७ | २००७ चा ७१ | बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीखाली महानिर्मिती कंपनीच्या दिनांक ०१-०४-२००७ ते ३१-०३-२०१० च्या पहिल्या नियंत्रण कालावधीतील आर्थिक वर्ष २००७-०८ या पहिल्या वर्षाच्या वार्षिक कामगिरीचा आढावा |
| ७२ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | लागू नाही | ३०.११.२००७ | २००७ चा ७२ | बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीखाली महावितरण कंपनीच्या आर्थिक वर्ष २००७-०८ ते २००९-१० च्या नियंत्रण कालावधीतील आर्थिक वर्ष २००७-०८ च्या वार्षिक कामगिरीच्या आढाव्याची याचिका |
| ७३ | बेस्ट उपक्रम | लागू नाही | १५.१२.२००७ | २००७ चा ७३ | बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीखाली बेस्ट उपक्रमाच्या आर्थिक वर्ष २००६-०७ च्या लेख्यातील समायोजनेस, आर्थिक वर्ष २००७-०८ करिता वार्षिक कामगिरीचा आढावा आणि आथिक वर्ष २००८-०९ करिता सुधारित अंदाजित एआरआर यांना मान्यता देण्याबाबत |
| ७४ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | लागू नाही | १८.१२.२००७ | २००७ चा ७४ | मिटरची किंमत विजेच्या देयकातून समायोजन करुन परत करण्यास मंजूरी मागण्याकरिता प्रकरण क्र. २००७/५६ मधील दिनांक २१-११-२००७ च्या सुनावणीचे आणि प्रकरण क्र. २००६/८२ मधील आयोगाच्या दिनांक १७-५-२००७ च्या आदेशाचे पुनर्विलोकन |

| अ. क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| ७५ | मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज ॲन्ड ॲग्रिकल्चर, पुणे | लागू नाही | २६.११.२००७ | २००७ चा ७५ | व्यापारी इमारती/औद्योगिक समुहांना मिश्र विद्युत भाराकरिता एकाच ठिकाणाहून वीज पुरवठा करणेबाबत |
| ७६ | पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन | लागू नाही | १९.११.२००७ | २००७ चा ७६ | दिनांक ०१-०५-२००७ पासून पिण्याच्या पाणी पुरवठा योजनांना लागू असलेल्या वीज दराचे पुनर्विलोकन |
| ७७ | हनिल इरा टेक्स्टाइल्स लि. | महावितरण कंपनी | ०२.११.२००७ | २००७ चा ७७ | प्रतिवादीने आकारलेला वीज दर आणि पाठविलेली देयके याबाबत |
| ७८ | इनऑर्बिट मॉल (इंडिया) प्रा. लि. | आरईएल | ११.१२.२००७ | २००७ चा ७८ | मे. रिलायन्स एनर्जी लि. च्या पुरवठ्याच्या क्षेत्रातील उच्च दाब पातळीवर वीज पुरवठा मिळत असलेल्या मल्टीप्लेक्सेस व शॉपिंग मॉल्सना लघु-दाब-९ वीज दराची वर्गवारी लावण्याबाबत |
| ७९ | आर. टी. टेक्सटाइल्स | महावितरण कंपनी | ०७.०९.२००७ | २००७ चा ७९ | विद्युत लोकपाल यांच्या दिनांक १७-०७-२००७ च्या आदेशाची व दिनांक १४-०८-२००७ च्या पुनर्विलोकन आदेशाची पूर्तता न केल्याबाबत |
| ८० | इस्पात इंडस्ट्रीज लि. | महावितरण कंपनी | ३०.११.२००७ | २००७ चा ८० | आयोगाने दिनांक २४-०८-२००७ च्या स्पष्टीकरणात्मक आदेशाने नियामक दायित्व आकार परत करण्याबाबत दिलेल्या निदेशांची अंमलबजावणी न केल्याबाबत |
| ८१ | चामुंडा टेक्स्टाईल्स | महावितरण कंपनी आणि टोरंट पॉवर लि. भिवंडी | १०.१२.२००७ | २००७ चा ८१ | ग्राहक गा-हाणे निवारण मंचाच्या दिनांक ३१-०७-२००७ च्या आदेशाची पूर्तता न केल्याबाबत |
| ८२ | नाथ पल्प ॲन्ड पेपर मिल्स लि. | महावितरण कंपनी | ११.१२.२००७ | २००७ चा ८२ | महावितरण कंपनीने नियामक दायित्व आकारांची रक्कम परत करणेबाबत |
| ८३ | स्व-वापरासाठीचे वीज निर्माते | महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (मेडा) आणि महावितरण कंपनी | १९.०१.२००८ | २००७ चा ८३ | प्रकरण क्र. २००६/६ मधील आयोगाच्या दिनांक १६-०८-२००६ च्या आरपीएस बाबतच्या आदेशाचे स्पष्टीकरण |
| ८४ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | लागू नाही | ०३.०१.२००८ | २००७ चा ८४ | आयोगाच्या दिनांक ५-५-२००० च्या आदेशातील निर्देशांनुसार महावितरण कंपनीच्या कार्यालयातील वेतन गट ३ व ४ मधील कर्मचाऱ्यांच्या भरतीस परवानगी |
| ८५ | महाराष्ट्र नूतनशील उर्जा विकास अभिकरण | महावितरण कंपनी | ०३.०१.२००८ | २००७ चा ८५ | वर्ग-२ वर्गवारीमधील पवन उर्जा प्रकल्पांकडून, सुरुवात केल्याच्या दिनांकापासून त्यांना आठ वर्षे होऊन गेल्यानंतर, त्यांच्याकडून पवन उर्जा प्राप्त करुन घेण्यासंबधातील प्रश्नांवर निर्देश देण्यासाठी, महावितरण कंपनीने दाखल केलेल्या याचिकेवर, आयोगाने २००७ च्या प्रकरण क्र.३३ मध्ये दिलेल्या दिनांक २०-११-२००७ च्या आदेशाची पूर्तता न केल्याबाबत |
| ८६ | मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, उद्योग व कृषी | महावितरण कंपनी आणि महाराष्ट्र शासन | ०८.०१.२००८ | २००७ चा ८६ | भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांच्यामधील सामंजस्य करारात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या पारेषण-वितरण हानीच्या मर्यादा ज्यांनी गाठल्या आहेत अशा पुणे शहरातील नागरी विभाग, ठाणे आणि नवी मुंबई यांना बाहेर काढून महावितरण कंपनीच्या मर्यादा वाढविणे आणि विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८ व १९ खाली दुसरा परवाना देणे व इतर सर्व सहाय्यकारी तरतुदी |
| ८७ | रामसन्स कास्टिंग्स प्रा. लि. | महावितरण कंपनी, नागपूर शहर झोन | ०३.०१.२००८ | २००७ चा ८७ | विद्युत लोकपाल यांच्या दिनांक १२-११-२००७ च्या आदेशाचे पालन न करणेबबत |
| ८८ | राज्य भार प्रेषण केंद्र | लागू नाही | ३१.१२.२००७ | २००७ चा ८८ | महावितरण कंपनीच्या राज्य भार प्रेषण केंद्राच्या मविनिआ (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ च्या विनियम १८.१ मध्ये नमूद केलेली कामे करण्यासाठी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक |
| ८९ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | मे. इंडिया विंड एनर्जी असोसिएशन व रिडॅम | २१.०२.२००८ | २००७ चा ८९ | वैधता कालावधी संपल्यानंतर गट-दोन वर्गवारीतील पवन ऊर्जा प्रकल्पांच्या ऊर्जा खरेदीचे आणि/किंवा ऊर्जेच्या वहनाच्या वीज दराकरिता दीर्घ-कालीन वाणिज्यिक व्यवस्था आणि इतर वाणिज्यिक अटी व शर्ती याकरिता निर्देश किंवा आदेश देणेबाबत |
| ९० | ठाणे स्मॉल स्केल इंडस्ट्रिज असोसिएशन | महावितरण कंपनी | २१.०१.२००८ | २००७ चा ९० | पुणे मॉडेलच्या धर्तीवर ठाणे, भांडुप व मुलुंड विभागास अखंडित वीज पुरवठा करणेबाबत |
| ९१ | सुझलॉन पॉवर इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. | लागू नाही | १६.०१.२००८ | २००७ चा ९१ | पवन ऊर्जा क्षेत्रातील २२० केव्ही आणि १३२ केव्ही पारेषण वाहिन्यांच्या रचनेसंबंधी वीज दराच्या अटी व शर्ती बाबतच्या विनियम २००५ मध्ये स्पष्टीकरण/सुधारणा होणेबाबत |

| अ. क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| ९२ | आयोग स्वत: | महावितरण कंपनी | ०७.०२.२००८ | २००७ चा ९२ | प्रकरण क्र. २००७/२६ आणि प्रकरण क्र. २००६/६५ मधील दिनांक २४ ऑगस्ट, २००७ चा आदेशासह दिनाक १० मार्च, २००४, दिनांक २० ऑक्टोबर, २००६ आणि १८ मे, २००७ च्या आदेशातील नियामक दायित्वांच्या आकारांशी संबधित भागाचे पुनर्विलोकन करण्यासाठी महावितरण कंपनीने दाखल केलेली याचिका |
| ९३ | यश ॲग्रो एनर्जी लि. | महावितरण कंपनी, महापारेषण कंपनी आणि महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र | ३०.०१.२००८ | २००७ चा ९३ | आरपीओच्या संदर्भात कोणत्याही दायित्वांशिवाय अन्य व्यक्ती/संस्थेला विजेची विक्री करण्यास परवानगी देणेबाबत आणि अन्य व्यक्ती/संस्थेला विजेची विक्री करण्याकरिता प्रतिवादींनी वितरण व पारेषण यंत्रणांना भेदभावारहित मुक्त प्रवेश देण्याबाबत |
| ९४ | महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि. | लागू नाही | २१.०१.२००८ | २००७ चा ९४ | बहु-वर्षीय वीज दराखाली २००७-०८ ते २००९-१० या नियंत्रण कालावधीकरिता, साठा उपसन क्रियेवर चालणा-या विद्युत निर्मिती केंद्राची एआरआर ठरविण्यासाठी संचालनाच्या प्रमाणकांना मान्यता देण्याबाबत आणि योग्य त्या तात्पुरत्या वीज दरास मान्यता देण्याकरिता अंतरिम आदेश निर्गमित करण्याबाबत |
| ९५ | बजाज ऑटो लि. | महावितरण कंपनी | ०१.०२.२००८ | २००७ चा ९५ | पवन उर्जा वीज दराबाबतच्या आयोगाच्या दिनांक २४-११-२००३ च्या संबंधात, वैधता कालावधी संपल्यानंतर, गट-२ वर्गवारीत येणा-या पवन उर्जा प्रकल्पांमधून विजेच्या वहनाकरिता किंवा पवन उर्जेकरिता वीज दराचा कालावधी व इतर वाणिज्यिक अटी व शर्तीबाबत निर्देश मिळण्यासाठी महावितरण कंपनीने दाखल केलेल्या प्रकरण क्र.२००७/३३ मधील आयोगाच्या दिनांक २०-११-२००७ च्या आदेशाबाबत स्पष्टीकरण मिळण्याबाबत |
